रविवार, २९ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३११
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पनवेलमध्ये ‘पथविक्रेता आत्मनिर्भर’ला प्रतिसाद/३

फ्लेमिंगोंच्या मुक्कामाने मच्छीमार अडचणीत/६

नॅशनल मास्टर गेम्स स्पर्धेत उरणच्या खेळाडूंचे सुयश/८

## कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचा महाराष्ट्रात शिरकाव

**मुंबई :** कोरोना विषाणूने पुन्हा एकदा डोके वर काढले असून बीए ४ आणि बीए ५ या दोन व्हेरिएंटने आता महाराष्ट्रात शिरकाव केला आहे. पुण्यात या दोन्ही व्हेरिएंटचे मिळून एकूण सात रुग्ण शनिवारी (दि. २८) आढळून आले आहेत. जिनोम सिक्वेंसिंग अहवालातून ही बाब स्पष्ट झाली आहे. दरम्यान, राज्यात गेल्या २४ तासांत ५२९ नवे कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. भारतात २४ तासांमध्ये दोन हजार ६८५ नवे रुग्ण आढळले असून एकूण ३३ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली. कोरोनाचे रुग्ण वाढण्याचे प्रमाण ०.०४ टक्के असल्याचेदेखील आरोग्य मंत्रालयाकडून सांगण्यात आले. असे असले तरीदेखील कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटने महाराष्ट्रात शिरकाव केल्याने चिंता वाढली आहे.



# सक्षम भारत घडवण्याचा आमचा प्रयत्न

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राजकोट येथे प्रतिपादन

**राजकोट : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या वेळी त्यांनी राजकोट येथील एका रुग्णालयाचे शनिवारी (दि. २८) उद्घाटन केले. उद्घाटन केल्यानंतर त्यांनी देशाला संबोधित करताना सांगितले की, गेल्या आठ वर्षांत आम्ही महात्मा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वप्नातील भारत घडवून प्रत्येक नागरिकाला आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला.



पंतप्रधान पुढे म्हणाले की, आम्ही विविध योजनांच्या माध्यमातून देशातील गरीब जनतेची सेवा केली. त्यांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला. कोविड-१९ साथीच्या काळात आम्ही गरीब जनतेसाठी देशातील अन्नधान्य साठा खुला केला आणि प्रत्येक नागरिकाचे लसीकरण केले आहे.

या वेळी बोलताना मोदी म्हणाले की, गेल्या आठ वर्षांत आम्ही महात्मा गांधी आणि सरदार पटेल यांच्या स्वप्नांतील भारत घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. देशातील गरीब, दलित, पीडित, आदिवासी, महिलांना सक्षम करेल, असा भारत महात्मा गांधींना हवा होता. अगदी तसाच प्रयत्न आम्ही केला. गरिबांचे सरकार असेल तर ते गरिबांची सेवा कसे करते, त्यांना सक्षम करण्याचे काम कसे करते, हे आज संपूर्ण देश पाहत आहे. १०० वर्षांतील सर्वात मोठ्या संकट काळातही देशाने सातत्याने याचा अनुभव घेतला आहे. कोरोना संसर्गाच्या काळात देशातील गरीबांसमोर खाण्या-पिण्याची समस्या होती. तेव्हा आम्ही देशातील धान्याचे कोठार खुले केले, असेही मोदी या वेळी म्हणाले.

**शरमेने कोणाहीपुढे मान झुकवली नाही**

गेल्या आठ वर्षांत आमच्या सरकारने विविध योजना राबवित असताना असे एकही काम आम्ही केलेले नाही की, ज्यामुळे आपल्यातील कोणाचीही मान शरमेने झुकेल.

आमचे सरकार नागरिकांना १०० टक्के सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोहीम राबवत आहे. प्रत्येक नागरिकाला सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमचे उद्दिष्ट असेल. यात कोणताही भेदभाव अथवा भ्रष्टाचाराला थारा नाही. कोरोना महामारीच्या काळात देशाचे मोठे नुकसान झाले, मात्र गरीबांसाठी आमचे सरकार कुठेही कमी पडले नाही. आमच्या माता-भगिनींच्या जनधन बँक खात्यात पैसे जमा केले, तसेच शेतकरी-मजुरांच्या बँक खात्यातही पैसे जमा करण्यात आले आहेत. शिवाय, गरिबांचे स्वयंपाकघर चालू राहावे म्हणून मोफत गॅस सिलिंडरची व्यवस्थाही केली. केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार देशसेवेची आठ वर्षे पूर्ण करीत आहे. या काळात आम्ही कोणतेही चुकीचे काम केले नाही. गेली अनेक वर्षे आम्ही गरिबांची सेवा, सुशासन आणि गरिबांचे कल्याण याला सर्वोच्च प्राधान्य दिलेय. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मंत्राला अनुसरून आपण देशाच्या विकासाला नवी गती दिली, असेही त्यांनी स्पष्ट केले.





**पनवेल : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी शहरातील सावरकर चौक येथील अर्धपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

# सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून मान्सूनपूर्व कामांचा आढावा; अधिकाऱ्यांना सूचना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीत ठिकठिकाणी मान्सूनपूर्व कामे वेगाने सुरू आहेत. त्या पार्श्वभूमीवर कोयनावेळे आणि सिद्धी करवले या स्मार्ट व्हिलेजमध्ये नालेसफाईच्या कामाची तसेच गावात सुरू असलेल्या रस्ते आणि गटारांच्या कामांची पाहणी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि. २८) करून आढावा घेतला, तसेच या कामांसंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



या वेळी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, नगरसेवक संतोष भोईर, दिनेश केणी, युवा नेते समीर कदम, रवी म्हात्रे, खारघर तळोजा मंडल उपाध्यक्ष निर्दोश केणी, गोपीनाथ पाटील, संतोष मढवी, शहर अभियंता संजय कटेकर, साळुंखे, जयराम कदम, कोयनावेळेचे माजी सरपंच विनेश कदम, नरेश कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## महाराष्ट्रावरील शनी लवकर दूर होऊ दे -राणा दाम्पत्य

**नागपूर :** राणा दाम्पत्य तब्बल ३६ दिवसांनी आपल्या कर्मभूमीत नागपूरमध्ये शनिवारी (दि. २८) सकाळी दाखल झाले. विमानतळावर दाखल झाल्यावर त्यांचे समर्थकांनी जोरदार स्वागत केले. त्यानंतर राणा दाम्पत्याकडून नागपुरातील एका हनुमान मंदिरात हनुमान चालिसाचे पठण करण्यात आले. त्यावेळी बोलताना नवनीत राणा म्हणाल्या की, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हा महाराष्ट्रासाठी विघ्न आहे. ते विघ्न दूर होण्यासाठी आम्ही हनुमानाच्या चरणी प्रार्थना करणार आहोत. हनुमान चालिसा पठण हा सगळा दिखावा करीत असल्याची टीका होत असल्याबाबत विचारणा केली असता, नवनीत राणा यांनी त्यावरूनदेखील मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. आम्ही दिखाव्यासाठी करतो, मुख्यमंत्री दिखाव्यासाठीही करीत नाहीत. आपल्या मुख्यमंत्र्यांनी एकदा दिखाव्यासाठी का होईना, हनुमान चालिसा वाचावी, असेही नवनीत राणा म्हणाल्या.

# शिवसेनेचे अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर

## परभणीच्या खासदाराची उद्धव ठाकरेंवर टीका

**परभणी : प्रतिनिधी**

सध्या अनेक घडामोडींमुळे महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद असोत किंवा पक्षांतर्गत वाद असोत, कोणत्या ना कोणत्या कारणाने समोर येत आहेत. आता ठिकठिकाणी शिवसेनेतील वादही उफाळून आला आहे. परभणीचे खासदार संजय जाधव यांनी, थेट मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असूनही पक्षाच्या कार्यकर्त्यांना ताकद मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना सर्व दिले जाते, मात्र शिवसेनेला डावलले जाते असा थेट आरोपच त्यांनी केला आहे.

पुण्यात २५ ते २९ मे या कालावधीत शिवसेनेचे शिवसंपर्क अभियान राबविले जात आहे. या अभियानाची पुण्यातील जबाबदारी जाधव यांच्यावर आहे. तत्पूर्वी त्यांनी शुक्रवारी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री ठाकरेंसह राष्ट्रवादीवर नाराजी व्यक्त केली. स्थानिक पातळीवर पक्षाला गळती लागलेली असतानाही वरिष्ठ नेते दुर्लक्ष करीत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये धुसफूस आहे.

खासदार जाधव म्हणाले, शिवसेनेचा मुख्यमंत्री असून पाठबळ मिळत नसल्याने येथील पदाधिकारी नाराज आहेत. पुणे जिल्ह्यात शिवसेनेचा एकही आमदार नाही. भाजपचे, राष्ट्रवादीचे आमदार आहेत, राष्ट्रवादीचे पालकमंत्री आहेत. आघाडीच्या निकषांप्रमाणे ज्या पक्षाचा आमदार त्यांना ६० टक्के आणि इतरांना २०-२० टक्के सत्तेचा शेअर मिळायला हवा, पण विकासकामांमध्ये हा शेअर मिळत नाही, अशी खंत खासदार जाधव यांनी व्यक्त केली आहे.

## महिलांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन शिबिर

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७१व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवारी (दि. ३०) खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालय येथे महिलांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.



महिलांमध्ये आढळणाऱ्या लठ्ठपणाची तपासणी, आयुर्वेदिक उपचार व आहार-विहार विषयक तज्ज्ञ डॉ. जाई केणी यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. दुपारी २ ते सायंकाळी ४ पर्यंत हे शिबिर होणार असून या शिबिराचा जास्तीत महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा व पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत यांनी केले आहे.

# पनवेल मनपा क्षेत्रात ३,९४० वैयक्तिक शौचालये उपलब्ध

**पनवेल : प्रतिनिधी**

महात्मा गांधींचे स्वच्छ व निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करावे, असे जनतेला आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये आजपर्यंत एकूण तीन हजार ९४० लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालये उपलब्ध करून देण्यात आली आहेत.



स्वच्छ भारत अभियानांतर्गत ज्या कुटुंबाकडे शौचालये नाहीत, अशा कुटुंबांना वैयक्तिक घरगुती शौचालय उपलब्ध करून देणे, अशाप्रकारे शहरातील प्रत्येक कुटुंबाला शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देऊन शहर हागणदारीमुक्त करणे तसेच शहरामध्ये ओडीएफ, ओडीएफ+, ओडीएफ++ व वॉटर प्लस अशा स्वच्छतेविषयक स्पर्धा घेणे, असे स्वच्छ भारत अभियानाचे स्वरूप आहे.

यासाठी निधीची उपलब्धता १२ हजार रुपये (केंद्र चार हजार + राज्य आठ हजार), स्थानिक स्वराज्य संस्था आठ हजार रुपये (१४ वा वित्त आयोग पाच हजार + मनपा निधी तीन हजार) असा एकूण लाभ २० हजार रुपये प्रति शौचालय देण्यात येतो.

**स्वच्छ भारत अभियान (नागरी) योजनेंतर्गत लाभ**

महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण तीन हजार ९४० लाभार्थ्यांना स्वच्छ भारत अभियान (नागरी)अंतर्गत लाभ देण्यात आलेला आहे.

**माझ्या घरामध्ये लहान मुली असल्याने सार्वजनिक शौचालय वापरण्यास अडचणी येत होत्या, परंतु स्वच्छ भारत अभियानांतर्गत मी वैयक्तिक शौचालय बांधल्यामुळे आज आमच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. शौचालय बांधकामासाठी पालिकेकडून २०,००० अनुदान मिळाल्याने आभारी आहोत.**
**-सुनिता केसला, पनवेल**

# अहमदाबादमध्ये आज रंगणार आयपीएलचा अंतिम सामना; मान्यवरांची उपस्थिती



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १५व्या हंगामाला २६ मार्च रोजी सुरुवात झाली होती. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून रविवारी (दि. २९) अहमदाबादमधील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर अंतिम सामना खेळवला जाणार आहे.

आयपीएलच्या १५व्या हंगामाचे विजेतपद मिळवण्यासाठी गुजरात टायटन्स व राजस्थान रॉयल्स हे दोन्ही संघ एकमेकांविरुद्ध लढताना दिसतील. या सामन्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या सामन्यासाठी आपली उपस्थिती लावणार आहेत.



**पनवेल : खारघरमधील शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते जी. एन. गुप्ता यांनी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र करीत भाजपमध्ये शनिवारी जाहीर प्रवेश केला. त्यांचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पक्षाची शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, विनोद ठाकूर, दीपक शिंदे, गीता चौधरी, शैलेंद्र त्रिपाठी, अजिंक्य नवघरे आदी उपस्थित होते.**

## किसान योजनेंतर्गत ई-केवायसीसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेंतर्गत लाभार्थ्यांना केंद्र शासनाने ओळख पडताळणी (ई-केवायसी) पूर्ण करण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबीयांस दोन हजार रुपये प्रतीहप्ता याप्रमाणे तीन हप्त्यात ६००० रुपये प्रती वर्षी लाभ त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. लाभार्थ्यास स्वतः पीएम किसान पोर्टलवर https://pmkisan.gov.in या लिंक आधारे किंवा सामायिक सुविधा केंद्रामार्फत ई-केवायसी पडताळणीच्या सुविधा उपलब्ध आल्या आहेत.

# नेरळ-कळंब रस्त्यावर अर्धवट जळालेला मृतदेह

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-कळंब राज्यमार्गावर पोशिर गावच्या हद्दीत एका तरुणाचा अर्धवट जळालेला मृतदेह शनिवारी (दि. २८) आढळला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत याबाबत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खुनाचा गुन्हा दाखल**

पोशिर गावाच्या हद्दीत पोश्री नदीच्या कडेला अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह असल्याची माहिती नेरळ पोलिसांना शनिवारी दुपारी मिळाली. नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांनी घटनास्थळ गाठले. तेथे कळंब वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश यादव यांनी पंचनामा केला. संबंधित मृतदेह २५ वयोगटातील तरुणाचा असून मृतदेह पेट्रोल टाकून जाळल्याचे सांगण्यात येत आहे. नेरळ पोलीस ठाणे तेथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

*घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलिसांनी अलिबाग येथून फॉरेन्सिक लॅब वाहन आणि डॉग स्क्वॅड घटनास्थळी बोलावले होते.घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक विजय लगारे आणि कर्जत तसेच नेरळ पोलीस ठण्याचे अधिकारी तैनात ठेवण्यात आले आहेत.*

# हनुमान चालीसा म्हणण्याला कुठेही बंदी येऊ शकत नाही

## ▮ विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात प्रतिक्रिया

**नागपूर : प्रतिनिधी**

देशात असो वा राज्यात कुठेही हनुमान चालीसा म्हणण्यावर बंदी नाही आणि येऊही शकत नसल्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

राणा दाम्पत्याचे शनिवारी दिल्लीहून नागपुरात आगमन झाले. अमरावतीला जाण्यापूर्वी त्यांनी नागपुरातील रामनगरमधील हनुमान मंदिरात हनुमान चालिसाचे पठण केले. दरम्यान, राणा दाम्पत्याने महाविकास आघाडी सरकारवर सडकून टीकाही केली. या मुद्द्यावर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपूर विमानतळावर माध्यमांशी बोलत होते. राणा दाम्पत्य नागपुरात आल्यावर काय घडले, याची मला कल्पना नाही. मात्र, देशात असो वा राज्यात कुठेही हनुमान चालीसा म्हणण्यावर बंदी नाही आणि येऊही शकत नाही. पण, जर कुठे अशी बंदी येत असेल तर ते योग्य नाही. कोण कोणाला काय म्हणाले, हे मला ठाऊक नाही, पण सर्वांनी बोलताना योग्य भाषेचा वापर करावा, असे मत फडणवीसांनी व्यक्त केले.




अलिकडेच केंद्रावर टीका करताना सरकार मसणात जाईल असे म्हटले आहे, यावर प्रश्न विचारला असता राज्यात असा कायदा आहे की, मुख्यमंत्री किंवा सत्तारुढ पक्षाविरुद्ध एक अक्षर जरी बोलले तर तुम्हाला किमान ५-१० ठिकाणी तक्रारी होऊन त्याला जेलमध्ये जावे लागते. पण देशाच्या पंतप्रधानांविरुद्ध कुणी बोलले तर त्याचा सन्मान होतो, ही आता महाराष्ट्राची परंपरा होत चालली आहे, अशी टीकाही फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारवर केली.

## पुणे-अहमदनगर मार्गावर धावणार राज्यातली पहिली इलेक्ट्रिक बस

### ■ एक जून रोजी होणार श्रीगणेशा

**पुणे : प्रतिनिधी**

प्रदूषणाची समस्या आणि इंधनाचे आकाशाला भिडलेले दर यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झालेली असताना एसटी महामंडळाकडून काहीसा दिलासा देणारी बातमी आली आहे. येत्या एक जून रोजी म्हणजे बुधवारी राज्यातील पहिली इलेक्ट्रिक बस 'शिवाई' या नावाने पुणे ते अहमदनगर दरम्यान प्रथमच धावणार आहे. योगायोगाची गोष्ट म्हणजे राज्यातील पहिली एसटीसुद्धा पुणे-अहमदनगर याच मार्गावर १ जून १९४८ मध्ये धावली होती. आता ७४ वर्षानंतर पुन्हा त्याच मार्गावर राज्यातली पहिली ई-एसटी प्रवास करणार आहे.

पुणे ते अहमदनगर हा प्रवास सुमारे १२५ किलोमीटर अंतराचा आहे. एरवी राज्य परिवहन मंडळाच्या बसेस हा प्रवास साधारणपणे तीन तासांत पूर्ण करतात. नवी शिवाई इलेक्ट्रिक एसटी पुणे - अहमदनगर मार्गावर किती थांबे घेणार, याची माहिती अद्याप मिळालेली नाही.

इंधनबचतीचा प्रभावी मार्ग म्हणून राज्यातील एसटीच्या ताफ्यात आता ई बस अंतर्भूत करण्यात येत असून, पहिल्या दोन ई एसटी दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. या ई एसटीसाठी पुणे विभागीय परिवहन मंडळाच्या कार्यालय परिसरात ई एसटीसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. ही पहिली इलेक्ट्रिक एसटी 'शिवाई या नावाने पहिला प्रवास करणार आहे. पुणे-नगर मार्गावरील धावेनंतर लवकरच पुणे- मुंबई, पुणे-कोल्हापूर या मार्गावरही ई-एसटी महिन्याभरात धाव घेईल.

पुण्याचे चार्जिंग स्टेशन कार्यान्वित करण्यासाठी तब्बल चार किलोमीटर लांबीची केबल टाकण्यात आली आहे, अशीही माहिती सूत्रांकडून मिळाली. 'शिवाई' या राज्यातल्या पहिल्या इलेक्ट्रिक एसटीचे तिकीट किती असणार, याची माहिती मात्र मिळू शकलेली नाही. पण लवकरच त्याची अधिकृत माहिती परिवहन मंडळामार्फत दिली जाणार आहे. तसेच 'शिवाई' ईलेक्ट्रिक एसटीचे वेळापत्रक कसे असेल, याचीही माहिती लवकरच जाहीर केली जाणार आहे.

## पंतप्रधान मोदींची सावरकर यांना आदरांजली

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहताना दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी सावरकरांचे वर्णन करताना केलेल्या भाषणाचा ऑडीओ ट्विट केला. भाजपनेही वाजपेयी यांच्या याच ऑडिओसह सावरकरांना आदरांजली वाहिली.'अभिजात देशभक्त और अद्वितीय स्वतंत्रता सेनानी विनायक दामोदर सावरकर यांना जयंतीनिमित्त श्रध्दांजली' असे भाजपने म्हटले आहे.

संसदेच्या मध्य कक्षात झालेल्या कार्यक्रमात लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला, संसदीय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल, दोन्ही सभागृहांचे महासचिव व अनेक खासदारांनी सावरकरांच्या



तैलचित्राला पुष्पांजली वाहिली. वाजपेयी यांच्या कार्यकाळातच माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या हस्ते सावरकरांच्या या तैलचित्राचे अनावरण झाले होते. दरम्यान महाराष्ट्र सदनात सावरकरांना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम अत्यल्प कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला.

व्यवस्थापिका भागवंती मेश्राम यांनी सावरकरांना अभिवादन केले. उपराष्ट्रपती एम.वेंकय्या नायडू, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आदिंनीही सावरकरांना अभिवादन केले.

मोदी यांनी वाजपेयी यांचे व स्वतःचे सावरकरांबद्दलचे भाषण ट्विट केले. त्यांनी सावरकरांच्या छायाचित्रांचा कोलाज असलेला व्हिडीओही शेअर केला.

'भारतमातेचे कर्मठ सुपुत्र वीर सावरकर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त श्रध्दांजली अर्पण करतो' असे मोदी यांनी म्हटले. नायडू यांनी म्हटले की, सामाजिक समरसतेसाठी व अस्पृश्यतेसारखा कलंक मिटविण्यासाठी सावरकरांनी केलेले गंभीर प्रयत्न सदैव आठवणीत राहतील. सावरकरांच्या जीवनाचे नवीन पिढीने अध्ययन करावे. शहा यांनीही सावरकरांच्या सामाजिक कार्याचा या वेळी गौरव केला.

## वृद्ध महिलेस भरदुपारी लुटले

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर गावातील एका वृद्ध महिलेला लुटले आहे. मोटारसायकलवरुन येत या चोरट्यांनी या महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळे खेचून ते पळून गेले. ही घटना शुक्रवारी भरदुपारी घडली आहे.

अधिक वृत्त असे, रंगुबाई मधुकर चिर्लेकर ही बाजारातील किराणा दुकानातून किरणा सामान घेऊन आपल्या घरी जात असताना गजबजलेल्या रस्त्यावर अज्ञात चोरट्यांनी या महिलेच्या गळ्यातील सोन्याची माळ खेचून ते आपल्या मोटारसायकलवरून पळून गेले आहेत. दरम्यान, चिरनेर परिसरात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय नागरीकांची वस्ती वाढली आहे. त्यामुळे या परिसरात अवैध धंदे राजरोसपणे सुरू आहेत. अशा अवैध धंद्यामुळे काहींनी आपला मोर्चा हा भुरट्या चोऱ्यांकडे वळविला आहे. चोरट्यांचा छडा लावण्या पोलीस यंत्रणेला अपयश येत आहे. त्यामुळे गजबजलेल्या वस्तीत जाऊन हे चोरटे नागरीकांच्या जीवाशी खेळून त्या घरातील, दुकानातील पैसे, मौल्यवान वस्तू लंपास करत आहेत.

दोन दिवसांपूर्वी मोठे भोम येथे एका महिलेला लुटण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केला होता. त्या प्रकरणाचा तपास लागलेला नाही. चिरनेर परिसरात चोरीच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर चोरट्यांचा पोलीस यंत्रणेने शोध घ्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र भगत व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## 'मविआ' ने संभाजीराजेंचा गेम केला

### विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचा आरोप

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

सन्मान म्हणून भाजपने संभाजीराजेंना राज्यसभेत सहा वर्ष संधी दिली. मात्र महाविकास आघाडीने त्यांचा ठरवून 'गेम' केला, असा आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी केला. एका कार्यक्रमासाठी औरंगाबाद शहरात आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

पुढे बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले, राष्ट्रवादी प्रमुख शरद पवार यांनी राज्यसभेसाठी संभाजीराजेंना पाठिंबा जाहीर केला. पवार महाविकास आघाडीचे प्रणेते असल्याने त्यांनी इतर दोन्ही पक्षांना बोलून पाठिंबा दिला असेल. मात्र, त्यानंतर संजय राऊत यांनी शिवसेना दुसरा उमेदवार देणार असे जाहीर केले. या पद्धतीने संभाजीराजेंची कोंडी करून महाविकास आघाडीने त्यांचा अवमान केला असा आरोपही दरेकर यांनी यावेळी केला. भाजपने त्यांचा कायम सन्मान केला आहे. त्यांनी उमेदवारी मागितली असती तर आम्ही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत चर्चा करून निर्णय घेतला असता. मात्र, ते आमच्याकडे आलेच नाहीत, असा दावाही दरेकर यांनी केला.





मुरुड : मुरुड समुद्र किनारी ओहटीच्या वेळी बोटी येण्यासाठी चार वर्षापूर्वी मत्स्य विभागाकडून चार कोटी रुपये खर्च करुन वाळू आणि गाळ काढण्यात आला होता. परंतु मुख्य समस्या होती ती, बोटी येण्यासाठी एकदरा येथील खडक काढण्याची. मात्र याकडे दुर्लक्ष झाले असून त्वरीत लक्ष देण्याची मागणी होत आहे. (छाया : सुधीर नाझरे)



पनवेल : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील सावरकर चौक येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास नगरसेविका दर्शना भोईर यांनी अभिवादन केले.

## 'पूर' दारात, 'रेषा' अडकली पुण्यात

### ▮ हिरण्यकेशीसह ताम्रपर्णी, घटप्रभा नदीकाठच्या गाववासियांची व्यथा

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

विभागातील हिरण्यकेशीसह घटप्रभा, ताम्रपर्णी नदीच्या उगमापासून महाराष्ट्र हद्दीपर्यंतच्या नदीकाठाची निळी व लाल पूररेषा निश्चित करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव पुण्याच्या मुख्य अभियंत्यांकडे सादर झाला आहे. परंतु त्याला अद्याप अंतिम मंजुरी नसल्याने 'पूर' दारात आणि 'रेषा' अडकली पुण्यात, अशी अवस्था निर्माण झाली आहे. यंदाचा पावसाळा उंबरठ्यावर असताना अजूनही हा प्रस्ताव लालफितीतच अडकला आहे.

हिरण्यकेशी नदीचा उगम आंबोलीत आहे. तेथून महाराष्ट्र हद्दीपर्यंतचे त्याचे अंतर ७१ किलोमीटर आहे. २०१९ व २०२१ च्या महापुरामुळे हिरण्यकेशीसह ताम्रपर्णी व घटप्रभा नदीकाठच्या गावांतील घरांसह शेतीचे प्रचंड नुकसान झाले. दरम्यान, वारंवार येणाऱ्या महापुरापूर्वी पूरग्रस्तांच्या स्थलांतराचे नियोजन करण्यासाठी पूररेषेचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. नद्यांकाठच्या निळी व लाल पूररेषा निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव पाटबंधारे विभागाने दिला आहे.

प्रस्ताव सध्या पुण्याच्या मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयात आहे. त्याला प्रशासकीय मंजुरीही मिळाल्याचे सांगण्यात येते. निविदा प्रसिद्ध होऊन त्यानंतर पूररेषा निश्चितीचे काम सुरू होणार आहे. मात्र अद्याप प्रस्ताव लालफितीतच असल्याने पूररेषा निश्चितीचे काम रखडले आहे. परिणामी, पूररेषेतच अजून काही ठिकाणी बांधकामे होत असून काही जण अंतिम पूररेषेच्या प्रतीक्षेत आहेत.

महापुराचे पाणी कुठेपर्यंत आले याची माहिती नागरिकांना माहीत असली तरी तांत्रिकदृष्ट्या पूररेषेची माहिती नागरिकांना गरजेची आहे.

अनेकांचे नदीच्या दिशेला भूखंड आहेत. त्यांना बांधकाम करायचे असले तरी त्याचा परवाना मिळण्यात अडचणी येतात. एक मार्गदर्शक दिशा म्हणून पूररेषेकडे पाहिले जाते. परंतु तीच कार्यवाही ठप्प राहिल्याने नागरिकांची अडचण झाली आहे.

पूररेषा निश्चित झाल्यास त्यात कोणता भाग येतो, किती कुटुंबांना स्थलांतरित किंवा पुनर्वसन करावे लागते याचे परफेक्ट नियोजन करता येते. याशिवाय पूररेषेतील शेतीमध्ये कोणती पिके घ्यावीत किंवा न घ्यावीत याचे मार्गदर्शन मिळते. परंतु पूररेषेचाच पत्ता नसल्याने अडचण निर्माण झाली आहे.

## नाशिकमध्ये डॉक्टरची रेल्वेखाली आत्महत्या

**नाशिक : प्रतिनिधी**

नांदगाव तालुक्यातील वाखारी येथे खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉ. नारायण महारू सागर (वय ६५) यांनी स्वतःला चालत्या रेल्वेखाली झोकून देत जीवनयात्रा संपविली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

शुक्रवारी (दि. २७) सकाळी साडेआठच्या सुमारास रेल्वे उड्डाणपुलाखाली लोहमार्गाजवळ डॉ.सागर आपली दुचाकी उभी करून थांबले होते. रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानाने त्यांना हटकले. त्याचवेळी समोरून येणारी मालगाडी बघताच अचानक त्यांनी स्वतःला झोकून दिले. वाखारी येथील टॅक्सीचालक भाऊसाहेब सोनवणे यांना ही माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. डॉ. सागर यांना जखमीवस्थेत ग्रामीण रुग्णालयात हलविले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. रेल्वे पोलिसांनी पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर त्यांचा मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. वाखारी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी असा परीवार आहे. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही.

## ठाकरे सरकारमुळे इंधन महागाईचा उच्चांक आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची टीका

**सातारा : प्रतिनिधी**

जनतेच्या हिताची कोणतीच योजना आखण्यात आणि अमलात आणण्यात महाराष्ट्रातील आघाडी सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. पेट्रोल-डिझेलवरील करात कपात केल्याचा गवगवा करून फसवणुकीचा नवा पायंडा पाडणारे ठाकरे सरकार कराद्वारे लूट करणारे देशातील पहिल्या क्रमांकाचे सरकार ठरले आहे, अशी टीका आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली आहे.

देशात सर्वाधिक महाग पेट्रोल-डिझेल महाराष्ट्रात मिळत असल्याने पेट्रोल- डिझेलवरील करामध्ये ५० टक्के कपात करून दारूचा न्याय पेट्रोल, डिझेललाही लावलाच पाहिजे, या मागणीचा पुनरुच्चारही त्यांनी केला. पेट्रोल, डिझेलवरील मूल्यवर्धित करामध्ये (व्हॅट) अनुक्रमे २.०८

**राज्याच्या व्हॅट आकारणीत कपात करा**

***ठाकरे सरकारने दारूवरील करात तब्बल ५० टक्क्यांची कपात करून दारू उत्पादकांना मोठा मलिदा मिळवून दिला. विदेशी मद्याला दिलेल्या सवलतीप्रमाणेच पेट्रोल, डिझेलवरील राज्याच्या व्हॅट आकारणीतही ५० टक्के कपात झाली पाहिजे.***

रुपये व १.४४ रुपये कपातीचा पोकळ गाजावाजा करून ठाकरे सरकारने पुन्हा एकदा जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली आहे.

महागाईने त्रासलेल्या जनतेस दिलासा देण्याऐवजी केंद्राविरुद्धच्या राजकारणात जनतेला वेठीस धरण्याचा ठाकरे सरकारचा डाव उघड झाला असून राज्याच्या करामध्ये ५० टक्के कपात करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी शिवेंद्रसिंहराजे यांनी केली आहे. केंद्र सरकारचा इंधनावरील कर केवळ १९ रुपये असताना ठाकरे सरकार मात्र, ३० रुपये कर आकारून जनतेचे खिसे ओरबाडत तिजोरी भरत आहे. त्यामुळे राज्यातील पेट्रोल डिझेल दरवाढीस राज्य सरकारच जबाबदार आहे.

केंद्र सरकारने गेल्या सहा महिन्यांत दुसऱ्यांदा पेट्रोल-डिझेलवरील अबकारी करात कपात केली. राज्य सरकारने एका पैशाचीही कपात न करता केंद्र सरकारने केलेल्या कर कपातीचे श्रेय घेण्याचा फसवा प्रयत्न करून जनतेची दिशाभूल केली. महाराष्ट्रात पेट्रोलवर लिटरमागे ३२.५५ रुपये, तर डिझेलवर लिटरमागे २२.३७ रुपये एवढा कर राज्य सरकार आकारते असेही ते म्हणाले.

# पनवेलमध्ये 'पथविक्रेता आत्मनिर्भर'ला प्रतिसाद

## महापालिका क्षेत्रात आतापर्यंत १,७६९ लाभार्थ्यांना निधी वितरीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना रायगड जिल्ह्यात प्रभावीप्रणे राबविण्यात आली आहे. यामध्ये पनवेल महापालिका क्षेत्रात आतापर्यंत बँकेकडून एकूण एक हजार ७६९ लाभार्थ्यांना प्रथम कर्ज (१० हजार रुपये) वितरीत करण्यात आले आहे व एकूण ११७ लाभार्थ्यांना द्वितीय कर्ज (२० हजार रुपये) वितरीत करण्यात आले आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नगरवासियांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तू व सेवांची उपलब्धता सुनिश्चित भूमिका बजावतात. त्यांना पथविक्रेता, फेरीवाला, ठेलेवाला, रेहरीवाला, ठेलीफडवाला इत्यादी नावाने विविध भागामध्ये ओळखले जाते. त्यांच्याद्वारे पुरवल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये उदा. भाज्या, फळे, तयार खाद्यपदार्थ, चहा, भजी, पाव, अंडी, कापड, वस्त्र, चप्पल, कारागीराद्वारे उत्पादित वस्तू, पुस्तके / स्टेशनरी इत्यादींचा समावेश होतो. तर सेवेमध्ये उदा. केशकर्तन दुकाने, चर्मकार, पान दुकान, कपडे धुण्याची दुकाने इत्यादींचा समावेश होतो.

कोविड-१९ सर्वत्र पसरलेला असल्यामुळे आणि परिणामी टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरीत परिणाम केला आहे. बहुदा ते कमी भांडवलावर पथविक्री करतात आणि जे काही भांडवल त्यांच्याकडे होते तेही या टाळेबंदीमध्ये शिल्लक राहण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी खेळते भांडवलाचा पतपुरवठा तातडीने प्रदान करण्याची आवश्यकता आहे. शहरातील पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा उभा करण्यासाठी योजना राबविण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

ही योजना १०० टक्के केंद्र पुरुस्कृत असून, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे संचलित असलेल्या योजनेची, रुपये १० हजार पर्यंतचे खेळते भांडवली कर्ज उपलब्धतेसाठी सुलभीकरण करणे. नियमित परतफेड करण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे ही उदिष्टे आहेत. या उद्दिष्टांच्या आधारे पथविक्रेत्यांना औपचारिकरित्या अर्थसहाय्य करण्यास ही योजना मदत करेल आणि या घटकाला त्यांची आर्थिक घडी बसविण्यासाठी नवीन संधी उपलब्ध करेल.

ही योजना दि.२४ मार्च २०२० रोजी व त्यापूर्वी शहरामध्ये पथविक्रीकरिता असलेल्या सर्व पात्र पथविक्रेत्यांना लागू असून काही निकषांच्या आधारे पथविक्रेते पात्र ठरतील. यामध्ये महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींनी प्रदान केलेले विक्री प्रमाणपत्र, ओळखपत्र असलेले पथविक्रेते, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती यांनी केलेल्या सर्वेक्षणात आढळलेले परंतु त्यांना विक्री प्रमाणपत्र, ओळखपत्र दिले गेले नाही. महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायत यांनी अशा विक्रेत्यांना आयटी आधारित प्लॅटफॉर्मद्वारे विक्रीचे तात्पुरते प्रमाणपत्र द्यावे व अशा विक्रेत्यांना एक महिन्याच्या कालावधीत त्वरीत आणि सकारात्मकतेने कायमचे विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

नगरपालिका क्षेत्रात हे उद्दिष्ट तीन हजार ४३४ चे होते. त्यापैकी प्राप्त अर्जांची संख्या दोन हजार ४३७ होती व त्यापैकी मंजूर प्रकरणे एक हजार २३४ आहेत. या लाभार्थ्यांना एकूण एक कोटी ३८ लक्ष ७० हजार इतका निधी वितरित करण्यात आला आहे.



# जासई येथे आरोग्य शिबिराला प्रतिसाद

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्यांचे आधारवड असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा येत्या २ जूनला ७१वा वाढदिवस आहे. त्या अनुषंगाने पनवेल तालुक्यातील जासई येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला असून १०० हून अधिका नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.



पनवेल तालुक्यातील जासई येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत आरोय शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून तपासणी तसेच नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराच्या वेळी जासई विभागीय अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, कामगार नेते सुरेश पाटील, उत्तर रायगड उपाध्यक्ष नीलकंठ घरत, जासईचे सरपंच संतोष घरत, गाव अध्यक्ष सुनील घरत, अमृत ठाकूर, शाळा व्यवस्थापन समितीचे उपसभापती गणेश पाटील, उरण तालुका युवा मोर्चा सरचिटणीस तेजस पाटील, युवा नेते भूषण म्हात्रे, गणेश घरत, चंद्रकांत पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या जन्मोत्सवानिमित्त हिंदू राष्ट्र-जागृती अभियान अंतर्गत हिंदू एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर सहभागी झाले होते. सोबत पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, किसन भोईर, आशिष कडू, दिलीप भोईर, गजानन पाटील होते.



पनवेल : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती तालुका व शहर भाजपच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.



पनवेल : महापालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक २० मध्ये सिडको हद्दीतील मान्सून पूर्व नालेसफाई कामे सुरू आहेत. या कामांची प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेविका चारुशीला घरत यांनी शनिवारी पाहणी केली. या वेळी आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अभिजित भवर, साई गणेशचे मोहन गुरम आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महान क्रांतिकारी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती शनिवारी (दि. २८) साजरी झाली. जयंतीनिमित्त पनवेल शहरातील सावरकर चौक येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिवादन केले.

पनवेल शहरातील सावरकर चौकाजवळ महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रुचीता लोंढे, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक पटवर्धन, पत्रकार संजय कदम, अमित ओझे, महेंद्र गोडबोले, संजय गुरुजी, सुनिल भगत, सोहन जोशी आदींनी अभिवादन केले.



## क्रेडिट कार्डमधून दिड लाखांचा अपहार

**पनवेल :** कळंबोली सेक्टर ६ मधील एका तरुणाच्या क्रेडिट कार्डमधून दिड लाख रुपयांचा अपहार झाल्याची घटना घडली आहे. नितीन जालिंदर पवार याच्या क्रेडिट कार्डमधून दिड लाख रुपये परस्पर हडप केले आहेत. हे पैसे भरत बिल्डर्स साहाजानपूर या खात्यावर गेले आहेत. याविषयी बँक व्यवस्थापनाकडे लेखी तक्रार केली होती. बँक व्यवस्थापनाच्या सूचनेवरून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेल मनपा आयुक्त, अधिकाऱ्यांचा नवी मुंबई रत्न पुरस्कार २०२२ने सन्मान

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

नवी मुंबई रत्न पुरस्कार २०२२ ने पनवेल महापालिका आयुक्तांसह, अतिरिक्त आयुक्त, मुख्य वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २७) सन्मानित करण्यात आले.



वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या समारंभात क्रेडाई एमसीएचआय नवी मुंबई युनिटच्यावतीने कोविड काळात महत्त्वपुर्ण काम केल्याबद्दल पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख, तृप्ती सांडभोर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, डॉ. रेहाना मुजावर, डॉ. भक्तराज भोईटे, कोविड हॉस्पिटल मैनेजमेंट व अधिपरिचारिका जीएनएम, आरोग्यसेविका एएनएम माहिती नोंदणीकार यांना नवी मुंबई रत्न पुरस्कार २०२२ वितरीत करण्यात आले.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात प्रत्येक शुक्रवारी दिव्यांगांना मिळणार दाखले

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य् विभागास मिळालेल्या सूचनांनूसार रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर आणि पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रूग्णालय पनवेल येथे अपंग व दिव्यांगांच्या दाखल्यांसाठी महिन्याच्या चारही शुक्रवारी सेवा सुरू करण्यात आली आहे.

अपंग व दिव्यांगांच्या तपासणीसाठी जिल्हा शल्य् चिकित्सक डॉ. सुहास माने यांच्याकडून तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यात येते. पनवेल महानगरपालिका व उपजिल्हा रूग्णालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीरोच नियोजन केले जाते. यापुढील काळात जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी सेवा देण्यात येणार आहे. यामध्ये अपंग व दिव्यांग नागरिकांस पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी युडीआयडी पोर्टलमध्ये ऑनलाइन रजिस्ट्रेशन करून दाखले देण्यात येणार आहेत तर दुसऱ्या व तिसऱ्या शुक्रवारी भिषक, बालरोगतज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, नेत्र तज्ज्ञ उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत मानसिक आजार व मंदबुध्दी व्यंग २४८, नेत्रव्यंग ३६, पक्षघात व्यंग ०९, अस्थिव्यंग २५० असे एकुण ५४३ पात्र लाभार्थ्यांना दाखले देण्यात आले आहेत.

### लाभार्थ्यांना आवाहन

***पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तसेच तालुका क्षेत्रातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेचे मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, उपजिल्हा रूग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. सचिन संकपाळ यांनी केले आहे.***



# उरण बायपास रस्त्याचे लवकरच भूमिपूजन

## आमदार महेश बालदींच्या पाठपुराव्याला यश

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील वाहतूक कोंडीला पर्याय असणाऱ्या उरण बायपास रस्त्याच्या कामांचा शुभारंभ लवकरच होणार आहे. या रस्त्याचे काम सुरू होण्यासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. एकंदरीतच उरण बायपास रस्त्यामुळे उरणकर वाहतूक कोंडीतून मुक्त होणार आहे.

उरण शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. अशा वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी उरण कोट नाका ते उरण पेन्शन पार्कपर्यंत बायपास रस्त्याची निर्मिती करण्यात यावी, अशी मागणी उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी तत्काळीन जिल्ह्याचे पालकमंत्री सुनील तटकरे यांच्याकडे वारंवार पत्र व्यवहार करून केली होती.

त्या अनुषंगाने त्यावेळी या बायपास रस्त्याच्या जागेचे सर्वे क्षण करून तत्काळ निधी मंजूर करण्यात यावा असे आदेश संबंधित अधिकारी वर्गाला देण्यात आले होते, परंतु गेली अनेक वर्षे सिडकोकडून निधी मंजूर होऊनही व निविदा प्रक्रिया होऊन ही उरण बायपास रस्त्याचे काम रेंगाळत पडले. त्यामुळे नागरिकांना, चाकरमान्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यांचे गांभीर्य लक्षात घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांनी उरण बायपास रस्त्याचे काम लवकरच सुरू करण्यात यावे यासाठी शासनस्तरावर वारंवार मागणी केली. या मागणीची दखल घेऊन उरण बायपास रस्त्याच्या कामासाठी सिडकोच्या माध्यमातून ४५ कोटीचा निधी मंजूर होऊन, टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या बायपास रस्त्याच्या कामांचा टेंडर नवी मुंबई येथील एका नावाजलेल्या कंपनीला देण्यात आला असून लवकरच उरण बायपास रस्त्याचा भूमिपूजन सोहळा सर्व पक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत होणार आहे.

# मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त दिशा महिला मंचतर्फे जनजागृती उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त २८ मे रोजी दिशा महिला मंच आयोजित मासिक पाळी जनजागृती व दृष्टिकोन विज्ञानाचा व समाजाचा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये खांदेश्वर हायवेजवळील झोपडीत राहणाऱ्या शिक्षणापासून वंचित महिला व तरुण मुलींनी सक्रिय सहभाग नोंदवला.

मासिक पाळीच्या संदर्भात समाजात अनेक अंधश्रद्धा आहेत. त्यामुळे महिलांच्या आरोग्यावर व मनस्वास्थ्य वर नकारात्मक परिणाम होत असतात. समाजात रुजलेल्या चुकीच्या धोरणामुळे मासिक पाळीला एक आजार समजला जातो किंवा मासिक पाळीमध्ये स्त्रीचा विटाळ केला जातो. त्यामुळे स्त्रियांची मानसिक स्थिती खालावते. मासिक पाळी हा आजार नसून विटाळ असून नवनिर्माणाची प्रक्रिया आहे याविषयी जनजागृती व्हावी म्हणून हा उपक्रम या परिसरात राबवला असे निलम आंधळे यांनी सांगितले.

मासिक पाळीदरम्यान येणाऱ्या अडचणी सहजपणे कशा सोडवता येतील, यादरम्यान घ्यावयाची स्वच्छता व काळजी तसेच मासिक पाळीविषयी असणारे गैरसमज याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी यशोदा हॉस्पिटल मधील डॉ. सिद्धिका यांनी विशेष मार्गदर्शन केले. विद्या मोहिते यांनी मासिक पाळी विषयी वाटणारी घृणा व मासिक पाळी आपली सखी कशी यावर चर्चसत्र केले. या अभियानात सॅनिटरी पॅड व साबण तसेच लहान मुलांना कपडे व खाऊचेही वाटप करण्यात आले.

या वेळी खुशी सावर्डेकर, नेहा देशमुख गीता कुडाळकर, अनिता मागाडे, अपर्णा गावडे तसेच ज्योती घोलप आदी उपस्थित होत्या.



# फंडामेंटली स्ट्राँग म्हणजे नक्की काय?

**नेहमीच बोलले जाते की, पडत्या बाजारात फंडामेंटली स्ट्राँग कंपन्यांचे शेअर्स घ्यावेत. फंडामेंटली स्ट्राँग म्हणजे काय जाणून घेऊया.**




**प्रसाद ल. भावे**
sharpadvisers@gmail.com

कोणत्याही कंपनीचा शेअर घेण्याआधी आधी त्या कंपनीचे फंडामेंटल्स (मूलभूत अथवा पायाभूत तत्त्व) काय आहेत ती तपासावयास हवीत, म्हणजेच त्या कंपनीची विविध फायनान्शियल स्टेटमेंट्स, कंपनी ज्या क्षेत्रात कार्यरत आहे, ते क्षेत्र, व्यवस्थापन आदी फायनान्शियल स्टेटमेंट्स मध्ये वार्षिक अहवाल, नफा-तोटा विवरणपत्र, ताळेबंद, उत्पन्न/कॅशफ्लो, आर्थिक गुणोत्तरे आदी येतात. तर आपण याबद्दल थोडक्यात जाणून घेऊया.

वार्षिक अहवाल : आर्थिक वर्ष अखेरीनंतर हा रिपोर्ट प्रकाशित केला जातो, जो आपणास त्या कंपनीच्या वेबसाईटवर सहज उपलब्ध होऊ शकतो. कंपनीच्या वार्षिक अहवालातील मुख्य अभ्यासण्यासारख्या गोष्टी म्हणजे व्यवस्थापन विचारविनिमय (Management discussion) व चेअरमन मेसेज. पहिल्या सदरात आपणास देशाच्या अर्थविषयक कृति व संस्थात्मक जगातील व्यावसायिक मत तसेच उद्योग क्षेत्रातील प्रवाह व येत्या वर्षातील अपेक्षा/गृहीत याबद्दल उहापोह असतो व आगामी वर्षाबद्दल व्यूह व आडाखे देखील मांडलेले असू शकतात. नंतरच्या सदरात आपणास कंपनी योग्य व्यक्तीच्या हातात आहे काया याबद्दल खात्री करता येऊ शकते. कंपनीचे व्यवहार पारदर्शक आहेत का, हे समजू शकते. व्यवस्थापन किती वास्तव आहे हे कळू शकते. यानंतर, मनुष्यबळ रिपोर्ट, रिसर्च आणि डेव्हलपमेंट रिपोर्ट इ. गोष्टी महत्त्वाच्या असतात. जर आम्ही वस्तूनिर्माण (manufacturing) कंपनीचा अभ्यास करत असू तर, मनुष्यबळ विकास रिपोर्टमध्ये आम्ही पाहू शकतो की कंपनीमध्ये कामगारांसंबंधी काही समस्या आहेत का?

आता वळूया आर्थिक विवरणपत्रांकडे (फायनान्शियल स्टेटमेंटस्कडे) यात देखील स्वतंत्र व एकत्रित असे दोन प्रकार असतात. जर मुख्य कंपनीची कोणती दुसरी दुय्यम-पूरक कंपनी असल्यास त्या सब्सीडरी कंपनीचा नफा/तोटा मुख्य(होल्डिंग/पेरेंट) कंपनीच्या नफ्या/तोट्यासह दाखवला गेल्यास त्यास कन्सोलिडेटेड स्टेटमेंट्स असे म्हणतात. अन्यथा फक्त मुख्य कंपनीच्या स्टेटमेंट्सला स्तंड अलोन म्हणतात.

नफा-तोटा विवरणपत्र - यामध्ये मुख्यत्त्वे, कंपनीचा ठराविक अवधीचा महसूल, महसूलासाठी आलेला खर्च, कर व घसारा आणि प्रति शेअर उत्पन्न या गोष्टींचा समावेश असतो. संपूर्ण उत्पन्नातून कंपनीचा खर्च उदा. (कच्चा माल, पगार-पाणी, भरलेले व्याज, घसारा व कंपनी चालवताना आलेला इतर खर्च) वजा केल्यावर करपूर्व नफा मिळतो व त्यातून कर वजा केल्यास कर पश्चात नफा काढता येतो. यालाच नक्त नफा किंवा P आणि L ची बॉटम लाईन देखील म्हणतात. या नक्त नफ्यास विक्रीस काढलेल्या शेअर्सच्या संख्येने (issued shares) भागल्यास जी संख्या येते त्यास प्रतिशेअर उत्पन्न म्हणजेच Earning Per Share (ईपीएस) म्हणतात. ज्याला या अभ्यासात फार वरचे स्थान आहे. याच संख्येने जर कंपनीच्या शेअर्सच्या बाजार भावास भागल्यास जे उत्तर येते त्यास पीई रेशो म्हणजेच किंमत उत्पन्न गुणोत्तर.




ताळेबंद (Balance-sheet)-P आणि L स्टेटमेंट आम्हाला त्या अवधीत कंपनीची कामगिरी कशी होती हे दाखवू शकते. तर ताळेबंद आपणास कंपनीची मालमत्ता(asset) व दायित्व(liability) या वरून कंपनीचा आता पर्यंतचा विकास दाखवतो. येथे अजून एक महत्वाची बाब समोर येते, ती म्हणजे दायित्व नसलेली म्हणजे(long term borrowing नसलेली) म्हणजे शून्यऋण कंपनी.

आता पाहू रोकडीचा ओघ (कॅश फ्लो) दाखवणारे स्टेटमेंट-हे स्टेटमेंट व्यवसायात येणारी/खर्च होणारी रक्कम याचा हिशेब ठेवते वत्याचा संबंध ताळेबंदातील मालमत्ता अथवा दायित्वाशी येतो. उदा. जाहिरातीसाठी केलेला खर्च हा (कॅश फ्लो मधील) रोकड कमी करतो. मात्र ताळेबंदात मालमत्ता म्हणून दाखवला जातो कारण त्यामुळे कंपनीचे नाव वाढण्यास मदत होते.

कॅशफ्लो स्टेटमेंट हे तीन प्रकारात विभागण्यात येते. कार्यकारी उपक्रमातून(operating activities) येणारा, गुंतवणूक उपक्रमातून (investment activities) आणि वित्तव्यवस्था उपक्रमातून (financing activities) येणारा कॅशफ्लो.जर कार्यकारी उपक्रमातून येणारा कॅश फ्लो धन (पॉझिटिव्ह) असेल तर ती कंपनी आर्थिकदृष्ट्या चांगली म्हणता येईल. हीच रक्कम ताळेबंदात मालमत्तेच्या बाजूस करंट असेट्स मध्ये दाखविली जाते.

अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे डेब्ट टू इक्विटी गुणोत्तर. वाढत्या कंपन्यांसाठी कर्ज ही गोष्ट त्यांच्या आर्थिक कामगिरीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. व्यवसाय वाढीसाठी कर्ज घेणे अपरिहार्य असले तरी ते नक्कीच डोईजड होऊ नये म्हणून लवकरात लवकर असंड़कर्ज फेडणे कंपन्यांसाठी फायदेशीर ठरते कारण कंपनीच्या नफ्यातील बराचसा भाग व्याजापोटी जास्त असतो.

कंपन्या त्यांच्या दैनंदिन कामकाजासाठी भांडवल वापरतात. हे भांडवल एकतर त्यांच्या स्वतःच्या निधीतून किंवा कर्जातून उभे राहू शकते. व्यवसाय व्यवस्थापित करण्यासाठी, कंपन्या एकतर स्वतःचे भांडवल वापरू शकते किंवा बँक किंवा इतर वित्तीय संस्थेकडून पैसे घेऊ शकते. कर्ज वित्तपुरवठा ही एक वेळ-मर्यादित क्रियाकलाप आहे. ज्यामध्ये कर्जदाराने कर्ज घेतलेल्या रक्कमेची आणि व्याजाची सहमती दिलेल्या कालावधीत परतफेड करणे आवश्यक आहे.

कर्ज-इक्विटी गुणोत्तर कंपनीच्या आर्थिक संरचना आणि व्यवस्थापनाशी संबंधित जोखमीची पातळी दर्शवते. हे गुणोत्तर दर्शविते की कंपनी आपला व्यवसाय करण्यासाठी किती कर्ज वापरत आहे आणि तिच्याकडे किती आर्थिक लाभ उपलब्ध आहे. वेळोवेळी त्यांची परतफेड करण्यासाठी संस्थेच्या दायित्त्व आणि वचनबद्धता यांना कर्ज म्हणून संबोधले जाते. कर्ज-इक्विटी गुणोत्तर, कंपनीची भांडवल रचना आणि यशाच्या संभाव्यतेचे चित्र उभं करू शकते.

कर्ज-इक्विटी गुणोत्तराचे फायदे, गुंतागुंत आणि महत्त्व समजून घेणारे व्यावसायिक अधिकारी त्यांच्या कंपनीला स्पर्धात्मक बाजारपेठांमध्ये स्पर्धा करण्यास मदत करण्यासाठी त्याचा वापर करू शकतात. उच्च कर्ज-ते-इक्विटी गुणोत्तरामुळे बँकेची परतफेड होण्याची शक्यता कमी होते आणि बँक अतिरिक्त निधी देण्यास नकार देऊ शकतात. कमी कर्ज-इक्विटी गुणोत्तर दर्शविते की व्यवसाय कर्जावर कमी अवलंबून आहे आणि इक्विटी स्थिती चांगली आहे. कर्ज-इक्विटी गुणोत्तर=(एकूण दायित्त्व)/(एकूण शेअरहोल्डर इक्विटी) शक्यतो ० ते १ दरम्यानचे गुणोत्तर चांगले समजले जाते. या फायनान्शियल स्टेटमेंट्सचे उत्तम पृथक्करण आर्थिक गुणोत्तरांद्वारे करता येते. बेंजामिन ग्रहम यांनी या आर्थिक गुणोत्तरांचा सिद्धांत मांडला त्यामुळे त्यांना मूलभूत पृथक्करणाचे (फंडामेंटल ॲनालिसीस) पिता म्हणून ओळखले जाते. त्याबद्दल आणि त्यावरून चांगल्या कंपन्या कशा निवडायच्या याबद्दल पुढच्या लेखात पाहू. दरम्यान कोणत्याही कंपनीचा शेअर घेण्याआधी आधी त्या कंपनीचे फंडामेंटल्स काय हे पाहणे खूप महत्त्वाचे असते.





**'अर्थप्रहर' या सदराखाली प्रसिद्ध होणारा अर्थतज्ज्ञ यमाजी मालकर यांचा लेख आणि प्रश्नमंजुषा रविवार, २९ मेच्या अंकात काही कारणास्तव प्रसिद्ध होणार नाही.**

# गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गाड्यांचे आरक्षण फुल्ल

## आता २६ ते ३० ऑगस्टपर्यंत आरक्षण मिळणार नाही



### *मागील दोन वर्षे कोरोनामुळे न गेलेले यंदा गावात जाणार*

***कोकणात शिमगा आणि गणेशोत्सव हे दोन सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. त्यामुळे शहरी भागातला चाकरमानी हा हमखास आपली कामे सोडून किंवा कामावरच्या सुट्ट्या घेऊन तो गणपतीला आणि शिमग्याला हजेरी लावतो. कोरोनामुळे मागील दोन वर्षे गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करायला मिळाला नव्हता. मात्र, यंदाच्या वर्षात कोरोनाचे विघ्न दूर झाले असून अनेकांनी आधीच तिकीट बुक केल्याने कोकण रेल्वेचे आरक्षण फुल्ल झाले आहे.***

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

कोकणातील सर्वात मोठा आणि आवडता सण म्हणजे गणेशोत्सव. याच गणेशोत्सवाला मुंबईतून मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात जातात. मात्र कोकणात येणाऱ्या कोकण रेल्वे गाड्यांचे गणेशोत्सवाच्या काळातील आरक्षण फुल्ल झाले आहे. २६ ते ३० ऑगस्ट दरम्यान अनेक गाड्यांच्या सर्व श्रेणीतील आसने आरक्षित झाली आहेत.

कोरोनाच्या निर्बंधांमुळे मागील दोन वर्षात गणेशोत्सवाच्या निमित्ताने गावाकडे जाता न आल्यामुळे चाकमान्यांनी यंदा उत्सव सुरु होण्याआधीच कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे तिकीट आरक्षित केले आहे. कोकणात जाणाऱ्या गाड्यांच्या आरक्षणाचा प्रयत्न करताच प्रतीक्षा यादी अधिक झाल्याने रेल्वेने आरक्षण देणेच बंद केले आहे.

काही गाड्यांना तर मोठ्या प्रमाणात प्रतीक्षा यादी असल्यामुळे यंदा मध्य रेल्वे, कोकण आणि पश्चिम रेल्वेला मोठ्या प्रमाणात जादा गाड्या सोडाव्या लागतील. तर एसटी महामंडळालाही तसे नियोजन करावे लागणार आहे. दरवर्षी गणेशोत्सवासाठी मुंबईसह अन्य भागातून तीन ते चार दिवस आधीच कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. त्यासाठी कोकण रेल्वे गाड्यांचे आरक्षण चार महिने आधीच फुल्ल झाले आहे.

कोरोनाच्या रुग्णांची संख्या कमी होत असल्याने यंदाचा गणेशोत्सव नेहमीच्या पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या वर्षी गणपती बाप्पाचे आगमन ३१ ऑगस्टला होणार आहे. यंदा गणेश चतुर्थी ३१ ऑगस्ट रोजी आहे. या दिवसापासून गणेशोत्सवाची सुरुवात होत आहे. कोरोनाचे निर्बंध उठविल्यानंतर गणेशोत्सवासाठी कोकण रेल्वे तिकिटांचे बुकिंग एप्रिल महिन्याअखेरीस सुरु झाले आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

## देशात ऑगस्ट २०२३ पर्यंत एक हजार 'खेलो इंडिया' केंद्र

**पुणे : प्रतिनिधी**

संपूर्ण देशात 'खेलो इंडिया' ची कमीत कमी एक हजार केंद्र असावीत, असा केंद्र सरकारचा मानस आहे. आतापर्यंत ४५० खेलो इंडिया केंद्रांना मंजुरी दिली असून १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत जवळपास एक हजार केंद्रांना मंजुरी मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. केंद्रामार्फत माजी खेळाडूंना प्रशिक्षक म्हणून नेमले जाईल असे केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने खाशाबा जाधव क्रीडा संकुल नामकरण सोहळा तसेच स्वामी विवेकानंद आणि पै. खाशाबा जाधव यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी खासदार गिरीश बापट, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. दीपक माने आदी उपस्थित होते.

# पुणे-मुंबई लोहमार्गावरील दरडींवर १४५ कॅमेऱ्यांची नजर

## ५९४ ठिकाणच्या दरडी सुरक्षित केल्या जाणार

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे-मुंबई रेल्वे मार्ग पावसाळ्यात अधिक सुरक्षित करण्यासाठी रेल्वेने घाटात १४५ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच, धोकादायक ठरू शकणाऱ्या तब्बल ५९४ ठिकाणच्या दरडी सुरक्षित केल्या जाणार आहेत. रेल्वे प्रशासनातर्फे यातल्या काही दरडी हटविल्या जातील, तर काहींना जाळ्या लावून सुरक्षित केल्या जात आहेत.

उपयोगात नसलेल्या रूळाची एक प्रकारे भिंत बांधून बोगद्याला आतून सुरक्षा दिली आहे. पावसाळ्यात दरवर्षी लोणावळा-कर्जत रेल्वे मार्गावर दरडी कोसळून रेल्वे वाहतूक ठप्प होते तर काही वेळा मोठे दगड रूळावर आल्याने रूळांचे मोठे नुकसान होते. या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून रेल्वे प्रशासनाने जवळपास ५८ बोगद्यात १४५ सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला असून, पैकी ८७ कॅमेरे बसविले गेले आहेत. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळतात, त्या ठिकाणी रूळांचे जाळे उभे केले आहे. त्यामुळे कोसळणाऱ्या दरडी रूळांना अडकून पडतील. त्याला ट्रॅकवर येण्यास मज्जाव होईल. परिणामी, रेल्वे०मार्ग बाधित होणार नाही.

**नियंत्रण कक्षाचा मोठा आधार**

पावसाळ्यात दरवर्षी बोरघाटात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. अंधारात दरडीवर नजर ठेवणे किंवा पडल्यावर त्याची नेमकी जागा शोधून काढणे हे खूप अवघड असते. २८ कि.मी.च्या मार्गावर ५८ बोगदे व देशातल्या लोहमार्गांपैकी सर्वांत तीव्र उतार व चढण असलेला हा भाग आहे. येथे काम करणे खूप आव्हानात्मक असते. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने ५८ बोगद्याच्या दोन्ही बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. त्यावर मुंबई येथील नियंत्रण कक्षातून नजर ठेवली जाते.

**बोरघाटातील ५९४ दरडींचे स्क्रीनिंग**

ज्याप्रमाणे मावळे दोरीचा आधार घेत किल्ल्यावर चढत वा उतरत त्याप्रमाणे रेल्वेचे हिलगँगच्या पथकातील कर्मचारी दोरीचा आधार घेत घाटाच्या बाजूस दऱ्या कपाऱ्यात उतरतात. तिथून धोकादायक दरडी पाडली जाते. जेणेकरून पावसाळ्यात त्या ट्रॅकवर येऊ नयेत. आतापर्यंत बोरघाटातील ५९४ ठिकाणच्या दरडीचे स्क्रीनिंग केले आहे. त्यातल्या काही दरडी हटविल्या जातील तर काही जाळ्यांनी सुरक्षित केल्या जाणार आहेत अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून उपलब्ध झाली आहे.

**दरडी कोसळून रेल्वेसेवा बाधित होऊ नये, या करिता रेल्वे प्रशासनाने वेगवेगळ्या पातळीवर उपाययोजना केल्या आहेत. यात सीसीटीव्हीपासून ते हिलगँगला प्रशिक्षण देण्यापर्यंतचा समावेश आहे. प्रवासी सुरक्षितता डोळ्यांसमोर ठेवून आम्ही उपाययोजना करीत आहोत.**

-शिवाजी सुतार, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे मुंबई

## सुकन्या समृद्धी योजनेत आता मोठे सकारात्मक बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

सुकन्या समृद्धी योजनेच्या माध्यमातून कन्येच्या नावाने दर महिन्याला थोडीफार बचत केली जाते. या योजनेत गुंतवणूक केल्यास मुलगी २१ वर्षांच्या झाल्यावर तिला लाखो रुपये मिळू शकतात. मात्र सरकारने या योजनेत मोठा बदल केला आहे.

मोदी सरकारने २ जानेवारी २०२५ रोजी 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' योजनेच्या अंतर्गत या योजनेची सुरुवात केली होती. मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी व त्यांच्या आर्थिक सुरक्षेसाठी केंद्रातील मोदी सरकारने सुकन्या समृद्धी योजना सुरु केली.

या योजनेत ८० (उ) अंतर्गत फक्त पहिल्या दोन मुलींच्या खात्यावर कर सूट देण्याची तरतूद होती. यामध्ये तिसऱ्या मुलीला हा लाभ मिळत नव्हता. नवीन नियमांनंतर आता जर एका मुलीनंतर दोन जुळ्या मुली असतील, तर त्या दोघांसाठीही खाते उघडण्याची सुविधा आहे. वडिलांना तीन मुली असतील तर तिघांच्याही नावे पैसे जमा करता येणार आहेत. सरकारच्या या योजनेत वर्षाला किमान २५० रुपये आणि जास्तीत-जास्त १.५ लाख रुपये जमा करता येतात. खाते किमान रकमेवर डीफॉल्ट आहे. नवीन नियमानुसार खाते पुन्हा सक्रिय न केल्यास मॅच्युरिटी होईपर्यंत खात्यात जमा केलेल्या रकमेवर लागू दराने व्याज दिले जाणार आहे. खात्यातील चुकीचे व्याज परत करण्याची तरतूद नाही आहे. सुकन्या योजना खात्यावरील वार्षिक व्याज प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी जमा केले जाईल. मुलीच्या मृत्यूनंतर किंवा पत्ता बदलल्यानंतर या योजनेचे खाते बंद केले जाऊ शकते मात्र आता यामध्ये खातेदाराच्या जीवघेण्या आजाराचाही समावेश करण्यात आला आहे.



**मच्छीचा हंगाम संपत आल्याने कोळी बांधवांनी बोटी किनाऱ्यावर आधीच ओढून ठेवल्या आहेत. आता पाऊस केव्हाही कोसळू लागेल या भीतीने मच्छी बांधवांनी आता बोटींवर छप्पर टाकायला सुरुवात केली आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# कोकण हापूसचे उत्पादन घटले

## भाव नसल्यामुळे शेतकरी हतबल



**खारेपाट : रामप्रहर वृत्त**

अतिवृष्टी, गारपीट, थंडी, धुके यांच्या अनिश्चिततेचा विपरित परिणाम हापूस आंब्याच्या उत्पादनावर झाला असून पूर्वीच्या तुलनेत आंबा उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे. यंदा हापूस आंब्याचा हंगाम दिड महिना उशीरा सुरु झाला. त्यामुळे भाव मिळत नसल्याने आंबा उत्पादक शेतकरी हतबल झाले आहेत.

पाच वर्षांपुर्वी ७० ते ७५ टक्के आंब्याचे उत्पादन मिळत असे. मागील पाच वर्षात ते कमी होऊन यावर्षी अवघे १८ ते २२ टक्क्यांवर आले असल्याची माहिती राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी दिली. १ व २ डिसेंबर २०२१ च्या अतिवृष्टीमुळे आंब्यावरील मावा, तुडतुड्याच्या आक्रमणामुळे मोहोर काळा पडला. पुन्हा मोहोर प्रक्रिया सुरु होण्यासाठी एक ते दिड महिन्यांचा कालावधी लागला. परिणाम हंगाम दिड महिना उशीरा सुरु झाला. त्यामुळे फेब्रुवारी १५ पासून सुरू होणारा आंब्याचा हंगाम एप्रिलपासून सुरु झाला. मात्र याचवेळी आंध्र, कर्नाटक येथील आंबे एपीएमसी व खाजगी मंडईत फार मोठ्या प्रमाणात आले. मागील १५ दिवसांपासून गुजराथमधून मोठ्या प्रमाणात आंब्यांची आवक झाली. याचबरोबर अन्य राज्यांतील लालबाग, बदामी व निरनिराळ्या प्रकारचे आंबे बाजारात आले व हे आंबे कमी पैशांत ग्राहकाला उपलब्ध होत असल्यामुळे हापूसचा दरदेखील खाली आला. अशा प्रकारे उत्पादन कमी असूनदेखील हापूसला दर नसणे अशी विचित्र परिस्थिती आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर आली आहे.

कोकणातील आंबा उत्पादकांचा ६० ते ६५ टक्के माल हा कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत (एपीएमसी) विकला जातो. मात्र मेच्या दुसऱ्या आठवड्यापासून एपीएमसीमधील दलाल व व्यापारीवर्ग शेतकऱ्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन २५० ग्रॅमहून अधिक वजनाच्या आंब्याच्या दोन डझनाच्या पेटीला अवघा ३०० रुपये भाव देत आहेत. त्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांत नैराश्याची भावना निर्माण होत आहे.

दरम्यान, पुढील वर्षीचा आंब्याचा हंगाम चांगला यावा व हवामान बदलाच्या संकटावर मात करता यावी, यासाठी शेतकऱ्यांना प्रभावी सेंद्रिय उत्पादने सवलतीने उपलब्ध करुन देण्याकरीता महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाने कोकणात मेळावे व सेमिनारच्या सहाय्याने सहकार्य करण्याचा संकल्प सोडला आहे. या अनुषंगाने पहिला मेळावा परहुर व दुसरा मेळावा अलिबाग येथे घेण्यात आला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना सेंद्रिय खतांचे सॅम्पल्स वाटण्यात आल्याची माहिती आंबा उत्पादक संघाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

# कडावमध्ये ई-श्रम कार्ड नोंदणी शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

समता केंद्र सामाजिक शैक्षणिक संस्था-कर्जत, कष्टकरी मुक्ती संघटना, कामगार आयुक्त कार्यालय-पनवेल आणि आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय-पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी उत्थान सप्तसूत्री कार्यक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील कडाव येथे आदिवासी ई-श्रम नोंदणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात २३० आदिवासी बांधवांची ई-श्रम कार्ड नोंदणी करण्यात आली.

या ई-श्रम कार्ड नोंदणी शिबिरात तहसीलदार विक्रम देशमुख यांनी आदिवासी बंधू-भगिनींसोबत मनमोकळी चर्चा केली. समता केंद्र सामाजिक शिक्षण संस्थेच्या सचिव स्मिता शैलैश काळे, कायदेशीर सल्लागार अॅड. कादंबरी काळे, आदिवासी कष्टकरी मुक्ती संघटनेचे मधुकर पाटील, सरपंच अशोक पवार, माजी उपसभापती भीमाबाई पवार, माजी ग्रामपंचायत सदस्य किसन पवार, कडाव मंडळ अधिकारी बी. डी. बुरुड, तलाठी आशिष राऊत, पी. पी. पवार, जयश्री मोरे, अश्विनी भामरे यांच्यासह ग्रामस्थ व आदिवासी बांधव या शिबिराला उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# परिवर्तन कार्यपुस्तिका जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्हा प्रशासनाने जानेवारी ते एप्रिल २०२२ या कालावधीत राबविलेल्या उपक्रमांची माहिती देणारी परिवर्तन (भाग २) ही कार्यपुस्तिका फ्लिपिंग ई-बुकच्या माध्यमातून सर्व नागरिकांना https://raigad.gov.in/en/parivartanebook/या लिंकवर वाचण्याकरिता विनामूल्य उपलब्ध आहे.

डॉ. महेंद्र कल्याणकर २४ ऑगस्ट २०२१ रोजी रायगड जिल्हाधिकारी पदी रुजू झाल्यानंतर जिल्हा प्रशासनातील सर्वांनी ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ महिन्यात परिवर्तन घडवून आणण्याची मनाशी खूणगाठ बांधली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने कामकाजास उत्साहाने सुरुवात केली. शेतकरी, कातकरी आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्रीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. त्यात विविध प्रकारचे शासकीय दाखले वाटप, आरोग्य शिबिर, वैद्यकीय उपचार, शासकीय स्वयंरोजगार निर्मिती आदी उपक्रमांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील युवक-युवतींमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी जागरुकता वाढावी या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने गरुड झेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ही संकल्पना अस्तित्वात आणली. या संकल्पनेचा विनामूल्य थेट लाभ रायगड जिल्ह्यातील सुमारे सात-आठ हजार विद्यार्थी घेत आहेत.शासनाने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे रायगड जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नागरिक व जिल्हा प्रशासनातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने जिल्ह्यात माझी वसुंधरा, कातकरी उत्थान अभियान आणि गरुडझेप स्पर्धा परिक्षा केंद्र हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्याचा जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे. परिवर्तनाचा दुसऱ्या अंकात या उपक्रमांची तसेच या कालावधीत जिल्ह्यातील इतर महत्वाच्या शासकीय कार्यक्रमांचीही माहिती प्रकाशित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील परिवर्तन (भाग २) ही रायगड जिल्हा प्रशासनाची कार्यपुस्तिका जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी संपादित केली आहे तर राष्ट्रीय सूचना आणि विज्ञान केंद्राचे जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा यांनी फ्लिपिंग ई-बुकच्या माध्यमातून सर्व नागरिकांना https://raigad.gov.in/en/parivartanebook/ या लिंकवर वाचण्याकरिता उपलब्ध करून दिली आहे.

नागरिकांनी ही पुस्तिका जरूर वाचावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# मुरूड येथील शिबिरात सहाशे रुग्णांची आरोग्य तपासणी

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व जेएसडब्ल्यू संजवनी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २८) मुरुड येथील अंजुमन हायस्कूलमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात सुमारे सहाशे रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.



(छाया : संजय करडे)

या आरोग्य तपासणी शिबिरात पोटाचे विकार, आमल्पित, आमवात, संधिवात, गर्भशयाचे विकार, सांध्याचे विकार, मणक्याचे विकार, किडनीचे विकार, हृदयरोग, त्वचारोग, सर्दी, ताप व खोकला आदी विकाराच्या रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली.

अंजुमन इस्लाम जंजिराचे सहसचिव रहीम कबले यांच्या हस्ते जेएसडब्ल्यू संजीवनी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलचे सैफ सलीम दळवी यांचा सत्कार करण्यात आला. जेएसडब्ल्यू संजीवनी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेचे फायदे प्रत्येक रुग्णाला दिले जात आहेत. उत्तम सुविधा व तज्ज्ञ डॉक्टर या ठिकाणी उपलब्ध आहेत, त्याच फायदा घ्यावा, असे आवाहन दळवी यांनी या वेळी केले.

अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य साजीद शेख, मुख्याध्यापक जाहीद गोठेकर, अंजुमन इस्लाम जंजिराचे चेअरमन जैनुद्दीन कादरी, खजिनदार अल्ताफ मलीक, सदस्य इम्रान मलिक, अजीम खानजादा, वाहिद हुजरूक या वेळी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **मे. जैन बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. श्री. अमरीत जैन,** पत्ता – **प्लॉट नं. ८२/८५, सेक्टर १ए, टिंबर मार्केट, कोपरखैरणे, नवी मुंबई – ४००७०९** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे/जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे देवद, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र. हे. आर. चौ. मी. | आकार |
|---|---|---|---|
| मे. प्लॅनेट बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. श्री. हबिब उमर खान | ६५/ब | ८८-३०-०० | ८८३.०० |
| पैकी ०-११-२१ हे. आर. पॉ. म्हणजेच (११२१ चौ. मी.) | | | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/ भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच मे. प्लॅनेट बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. श्री. हबिब उमर खान यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक :- २८/०५/२०२२

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**


# माणगावच्या बाजारात रानफळांची आवक वाढली

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

उन्हाळा म्हणजे रानफळांची मेजवानी घेऊन येणारा ऋतू असतो. इतर कोणत्याच ऋतूत न मिळणारी फळे, फुले खास या ऋतूत मिळतात. यामध्ये जांभळे, करवंदे, आठुरणी, कोकम इत्यादी फळांचा समावेश असतो. उन्हाळी दिवसांत तयार होणारी ही फळे म्हणजे खवय्यांसाठी सुखद असा गोडवा असतो.

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर आंबा, काजू इत्यादी फळांवरोबर सर्वसामान्यांच्या आवडीची असलेली खास अशा गोडव्याची फळे म्हणजे जांभळे आणि करवंदे होत. रानाची मैना म्हणून करवंदांचा उल्लेख केला जातो. कोकणातील डोंगररांगात दिसणाऱ्या लहान-मोठ्या विस्तीर्ण भागात करवंदाच्या जाळी म्हणजेच विविध पशुपक्ष्यांसाठी निवारा. आंबट-गोड चवीला लागणारी करवंदे उन्हाळ्यातील रानमेवा म्हणून प्रसिद्ध आहेत. सध्या करवंदे १० ते २० रुपये वाटा या भावाने विकली जात आहेत. पळसाच्या पानात करवंदाची विक्री केली जाते.



जांभळाचे आयुर्वेदात असंख्य उपयोग सांगितले आहेत. जांभळे मधुमेहींसाठी खास औषधी आहेत. हाडकी, मांसवाली, मनुकांच्या आकाराची, तर काही टपोरी असणारी जांभळे खवय्यांसाठी पर्वणी असते. उन्हाळी दिवसात तयार होणाऱ्या या जांभळांना चांगली मागणी असून १५० ते २०० रुपये किलोप्रमाणे ती विकली जातात. करवंदे, जांभूळबरोबरच लाल-चुटुक रंगांनी मनवेधून घेणारी कोकमाची फळे ही या ऋतूमध्ये तयार होतात. आयुर्वेदातही या फळांचे अनेक उपयोग, गुणधर्म सांगितले आहेत. ५० ते ६० रुपये किलोप्रमाणे ही फळे विकली जातात. आठूरणी, मंदुकली इत्यादी लहान-मोठी फळेही खवय्यांसाठी पर्वणी असते. वटपौर्णिमेच्या निमित्ताने या रानमेव्याला चांगली मागणी असते. सुवासिनी वाणात आवर्जून या रानफळांनी वाण सजवतात. रानफळांचा हा हंगाम खास वटपौर्णिमेपर्यंत सुरू राहतो. त्यानंतर मात्र रानफळांचा हंगाम निघून जातो.

# रायगडातील कोकम फळावर निसर्ग रूसला!

**रेवदंडा : रामप्रहर वृत्त**



अलिबाग तालुक्याच्या दक्षिण टोकाला असलेल्या चौल-रेवदंडामध्ये अनेक वर्षांपासून नारळी-पोफळींच्या बागेत आंतरपीक म्हणून बहुगुणी कोकम वृक्षाची लागवड केली जात होती. दोन वर्षांपूर्वी निसर्ग आणि गतवर्षी तौत्के चक्रीवादळात कोकमाची अनेक झाडे उन्मळून पडली. त्यातच कोरोनामुळे फळांची विक्री करण्यासाठी बाजारपेठाही बंद होत्या. त्यामुळे हे पीक घटल्याचे लक्षात आले नाही. यावर्षी मात्र कोकम फळांचा हंगाम सुरू होताच बागायतदारांना पीक घटल्याची जाणीव झाली. अमृत सरबत म्हणून नावाजलेल्या या फळावर निसर्ग रूसला असल्याची भावना बागायतदारांमध्ये आहे.

साधारण एप्रिलच्या मध्यात पक्की झालेली फळे बाजारात येतात. या ताज्या फळाचे पर्यटक आणि चाकरमानी हे मुख्य ग्राहक आहेत. शेकडा १५० ते २०० रुपये भाव फळाच्या आकारमानानुसार आहे. कोकणात हे पीक एके काळी विपुल येत होते; पण वातावरणातील बदल, विविध प्रकारची घोंघावणारी चक्रीवादळे आणि माकडांनी वृक्षावर केलेला कब्जा याचा परिणाम उत्पादनांवर झाला. कोकम पीक घटले आहे.

**चक्रीवादळात कोकम वृक्ष मोठ्या संख्येने नष्ट झाले. बागायतदारांनी आता नवीन लागवड केली असली, तरी फळ येण्यास काही वर्षे जाणार असल्याने उत्पादन घटले आहे.**

**-राजेश मुकादम,कृतिशील बागायतदार, रेवदंडा, ता. अलिबाग**

# रोह्यात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि रोहा तालुका सिटीझन फोरम ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रोह्यातील श्री धावीर देवस्थान भक्तनिवास येथे गुरुवारी (दि. २) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराच्या अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी ८००७२०१२३२ किंवा ८९४९४२१०१६ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन रोहा तालुका सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितिन परब आणि निमंत्रक आप्पा देशमुख यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, **श्री स्वामी समर्थ इन्फ्राकॉन** तर्फे प्रोप्रा. **श्री. अनिल अब्दागिरे,** पत्ता शॉप नं. १७, साई संसार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३०, सेक्टर ५, डी मार्ट मागे, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, **२) श्री. हेमंत वासुदेवराव आंबिलकर,** पत्ता – शिवनेरी सोसायटी, वडगांव रोड, वडगांव, यवतमाळ – ४४५००१ हे खालील वर्णन केलेली मिळकत **मे. ए. पी. ग्रुप तर्फे श्री. अरविंद रेवणसिध्द माने,** पत्ता – ऑफिस नं. २२, पहिला मजला, वेल्फेअर चेंबर्स, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई – ४००७०३ आणि **श्री. एम. जे. महेश** पत्ता – मु. वाघिवली वाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडुन जमीन मिळकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे वडघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| भुखंड क्र. | सेक्टर | नोड | तालुका/जिल्हा | क्षेत्रफळ चौ. मी. | सिडको संचिका क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ५२ | आर-५ | वडघर | पनवेल, रायगड | ११० | ४९ |

सदरहू जागा, जमिन व मिळकती संबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट, जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध, असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा व संबंधितांना हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडुनही काही लेखी, हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहे असे गृहित धरून मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करण्यात येईल व विहित मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/ तक्रारी या आमचेवर बंधनकारक असणार नाहीत याची सबंधितांनी नोंद घ्यावी.

पनवेल,
दिनांक :- २५/०५/२०२२

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**


# कर्जत व म्हसळ्यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (२८) त्यांना कर्जत नगर परिषदेतर्फे अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी उमेश राऊत, रविंद्र लाड, अविनाश पवार, सुदेश गायकवाड, मुकेश परदेशी आदी उपस्थित होते.



(छाया : विजय मांडे)




(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुका सार्वजनिक वाचनालयामध्ये शनिवारी (दि. २८) सकाळी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिवादन करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष संजय खांबेटे, सचिव अशोक काते, संचालक सुनिल उमरटकर, सुजय कुसाळकर, ग्रंथपाल उदय उर्फ बाळू करडे, सायली चोगले यांच्यासह वाचक उपस्थित होते

## निवडक

### पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहरातील भाजी मार्केट परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस करत आहे. मयत व्यक्ती अंदाजे वय ५५ ते ६० वर्षे, रंग सावळा, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मध्यम, चेहरा गोल, डोक्याचे केस वाढलेले काळे व पांढरे, दाढी पांढरी, मिशी वाढलेली असून अंगात पांढरा शर्ट व निळी पॅन्ट घातली आहे, तसेच डाव्या हातावर रेशमा कांता असे गोंदलेले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा.

### सहाय्यक आयुक्त महेन्द्र ठोके सेवानिवृत्त

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेचे सहाय्यक आयुक्त



महेन्द्रसिंग ठोके हे आपल्या २२ वर्षे प्रदीर्घसेवेनंतर ३१ मे रोजी, सेवानिवत्त होत आहेत. उत्कृष्ट अधिकारी म्हणून ते महापालिकेत परिचित होते. महेन्द्रसिंग ठोके यांनी सन १९९८साली अधीक्षक कर वसुली म्हणुन, पालिकेतील आपल्या सेवेला सुरुवात केली. त्यानंतर, विभागउर्णक अधिकारी, उपकर अधिकारी, प्रशासक अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांना पालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदी पदोन्नती देण्यात आली. पालिकेच्या सेवेतील आपले २२ वर्षे पुर्ण केल्यानंतर ते ३१ मे रोजी सेवानिृत्त होत आहेत. पालिकेच्या सेवेदरम्यान, त्यांच्या मनमिळावू स्वभाव व सर्वांनासोबत घेऊन जाण्याची त्यांची वृत्ती यामुळे, त्यांची सेवानिृत्तीनंतर त्यांचे सहकारी, मित्र, वरीष्ठ अधिकारी याच्याकडून निरोप देताना शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

### गणपत वारगडा यांना पुरस्कार जाहीर

**मोहोपाडा :** लोकांकित वृत्तपत्राच्या सहाव्या वर्धापन



दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वृत्तपत्राबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून नाट्य क्षेत्रातील कलाकार, सामाजिक कार्यकर्ते यांना समाज भुषण, जीवन गौरव तसेच विविध माध्यमांतील पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गणपत वारगडा यांना सामाजिक कार्याची पावती म्हणून राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. वृत्तपत्राच्या व आदिवासी सेवा संघाच्या माध्यमातून वारगडा यांनी ठाणे, पुणे, नवी मुंबई, रायगड जिल्हामध्ये आदिवासी सेवा संघाच्या शाखा तयार केल्या गेल्या. वारगडा यांना राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# फ्लेमिंगोंच्या मुक्कामाने मच्छीमार अडचणीत

## किनाऱ्यावर सहज मिळणाऱ्या छोट्या मासळीची टंचाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

थव्यांच्या रूपात खाडीमध्ये श्वेत-गुलाबी रंगाची चादर पसरवणाऱ्या फ्लेमिंगो अर्थात रोहित पक्ष्यांच्या दर्शनासाठी नवी मुंबई हे महत्त्वाचे ठिकाण बनत आहे. पुरेसे खाद्य आणि जैवविविधता मिळत असल्याने फ्लेमिंगोंचा यंदा मुक्कामही वाढला आहे, मात्र हा लांबलेला अधिवास नवी मुंबईतील मच्छीमारांच्या खिशाला कात्री लावू पाहात आहे.



नवी मुंबईतील खाडीकिनारी उथळ पाण्यात सहज सापडणाऱ्या पातळी, झिंगा, तुडतुडी, कोलंबी यांसारख्या मासळी आणि त्यांच्या अंड्यांवर फ्लेमिंगो यथेच्छ ताव मारत असल्याने मच्छीमारांच्या जाळ्यात ही मासळी सापडेनाशी झाली आहे. त्यामुळे कमाईचे साधन हरवत असल्याचे मच्छीमारांचे म्हणणे आहे.

मुंबई, उरण येथील खाडीकिनारी हिवाळ्याच्या दिवसांत स्थलांतर करणारे फ्लेमिंगो पक्षी गेल्या काही वर्षांत नवी मुंबईतील नेरूळ, वाशी, बेलापूर येथील खाडीकिनाऱ्याला पसंती देत आहेत. या ठिकाणी गेल्या काही वर्षांत हजारोंच्या संख्येने फ्लेमिंगोंनी अधिवास केल्याचे आढळून येत आहे. यंदा हे प्रमाण आणखी वाढले आहे. इतकेच नव्हे तर, साधारण मार्चनंतर आपल्या मूळ अधिवासाकडे प्रयाण करणाऱ्या फ्लेमिंगोंनी मे महिना आला असतानाही मुक्काम कायम ठेवला आहे.

फ्लेमिंगोंचा मुक्काम लांबल्याने पक्षीप्रेमी आणि पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, मात्र स्थानिक मच्छीमार मात्र हैराण झाले आहेत. पाणथळ आणि खाडीकिनारी आढळणाऱ्या छोट्या मासळी, त्यांची अंडी, किडे यावर ताव मारणाऱ्या फ्लेमिंगोंमुळे मच्छीमारांना ही छोटी मासळी मिळेनाशी झाली आहे.

> **ठाणे खाडीकिनारी फ्लेमिंगो पक्षी मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. फ्लेमिंगो पक्ष्यांचे दर्शन नयनरम्य वाटते, मात्र या पक्ष्यांमुळे अलीकडे खाडीकिनारी मिळणारी छोटी मासळी मिळेनाशी झाली आहे. याचा आम्हा मच्छीमारांना मोठा फटका बसतो.**
> **-जयंता कोळी, मच्छीमार, दिवाळे**



ओहोटीच्या जागी मिळणारी पातळी, झिंगा, तुडतुडी, कोलमी यांसारखी मासळी गायब झाल्याचे कोळी समुदायातील काही नागरिकांनी सांगितले.

# नवी मुंबईमध्ये कोरोना रुग्णांत वाढ

## आठवडाभरात ११८ नवे रुग्ण दैनंदिन रुग्णसंख्या २०च्या वर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कोरोनाबाधित रुग्णांची संख्या मागील आठवडाभरापासून वाढत असल्याचे चित्र आहे. नवी मुंबईत मागील तीन दिवसांपासून दिवसाला २० व त्यापेक्षा अधिक रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे पालिकेने रुग्णसंख्या वाढताच तत्काळ खाटांची सुविधा करण्याची व्यवस्थाही केली असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.

सध्या शहरातील एकमेव कोरोना उपचार केंद्र असलेले वाशी प्रदर्शनी केंद्रही बंद असले तरी वाढत्या रुग्णसंख्येमुळे पालिकेने नुकतीच या केंद्राची पाहणी केली असून कोरोनाची रुग्णसंख्या वाढल्यास तत्काळ खाटांची सुविधा उपलब्ध करता येणार आहे. रुग्णांची संख्या वाढल्यास तत्काळ सुविधा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

शहरात आतापर्यंत जवळजवळ ३४,७६,६४१ चाचण्या करण्यात आल्या आहेत. एमएमआर क्षेत्रात व ठाणे जिल्ह्यात करोनाचे रुग्ण वाढत असल्याने पुन्हा कोरोनाचे संकट घोंघावत आहे की काय अशी चिंता वाटू लागली आहे. शहरात संपूर्ण निर्बंध हटवल्यानंतर शहरात सर्व व्यवहार सुरळीत झाले आहेत. शहरात कोरोनाच्या दैनंदिन रुग्णांची संख्या अनेक दिवसांपासून एक अंकी येत होती. पालिकेने चाचण्यांची संख्याही काही प्रमाणात कमी केली आहे. शहरात दीड लाखांपेक्षा अधिक जण आतापर्यंत कोरोनाग्रस्त झाले आहेत.

दरम्यान, कोरोना रुग्णसंख्येत मागील काही दिवसांपासून वाढ होत असल्याचे दिसून येत असले तरीही सुमारे एक महिन्याच्या कालावधीत करोनामुळे एकही रुग्णाचा मृत्यू झाला नसल्याची बाब समोर आली आहे.

> **नवी मुंबईत कोरोनाची रुग्णसंख्या अत्यंत नियंत्रणात असून मागील काही दिवसांपासून नवी मुंबईत करोना रुग्णांची संख्या वाढते आहे. दैनंदिन करोना रुग्णसंख्या पुन्हा २० पर्यंत आली आहे.**
> **-संजय काकडे, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# नवी मुंबई भाजपतर्फे कृपाशंकर सिंह यांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपा उपाध्यक्ष, उत्तर भारतीय मोर्चा महाराष्ट्र प्रभारी कृपाशंकर सिंह यांनी



शुक्रवारी (दि. २७) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांच्या निवासस्थानी व उत्तर भारतीय मोर्चाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष राजेश राय यांच्या कार्यालयास देखील भेट दिली. या वेळी मोठ्या संख्येने उत्तर भारतीय समाज व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी माजी मंत्री कृपाशंकर सिंह यांचे स्वागत केले. उत्तर भारतीय आघाडीच्या प्रदेश प्रभारीपदाची सूत्रे सिंग यांनी हाती घेताच पहिली भेट नवी मुंबईला भेट दिल्याने कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार केला. या वेळी श्री कृपाशंकर सिंह यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने उत्तर भारतीय समाजातील सर्व कार्यकर्त्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

# वाढत्या तापमानामुळे तडफडणाऱ्या पक्ष्याला रिक्षाचालकाने दिले जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेलमध्ये वाढत्या तापमानाचा फटका बसलेल्या पक्ष्याला एका रिक्षाचालकाने जीवदान दिले आहे.

सध्या उष्णतेचा तडाखा माणसासोबत पक्ष्यांनाही बसताना दिसून येत आहे. पावसाळा जवळ येत असल्याने तापमानात वाढ होत आहे. नवीन पनवेल येथील सेक्टर १९ परिसरात वाढत्या तापमानामुळे रस्त्यावर पक्षी तडफड करत पडला असता अनेक जण येणारे जाणारे बघ्याची भूमिका घेताना दिसत होते. रिक्षा व्यवसाय करणारे रुपेश खादेकर यांना तडफडत असलेला पक्षी दिसल्या बरोबर जवळ जाऊन पक्षाला उचलून घेऊन पाणी पाजले थोडया वेळाने पक्षाची तडफड कमी झाल्यावर त्याला सुरक्षित ठिकाणी त्याला ठेऊन जीवदान दिल्याने रिक्षाचालक रुपेश खांदेकर यांचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

लहानपणापासून पक्षी प्राण्यांची आवड असल्याने रिक्षा व्यवसाय करताना अनेकवेळा पक्षी विविध प्राणी उन्हाळ्यात रस्त्यावर पडलेले दिसले की, त्यांना पाणी पाजतो, सुरक्षित जागेवर ठेवत असतो, असे प्रतिनिधी शी बोलताना रुपेश खांदेकर यांनी सांगितले.



# कळंबोलीमध्ये सॅनिटरी नॅपकिन वाटप

**पनवेल : वार्ताहर**

'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस दरवर्षी २८ मे रोजी साजरा केला जातो. मासिक पाळीच्या काळात महिलांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे हा यामागचा उद्देश आहे. खेड्यापाड्यात आणि शहरांमध्ये गरीब वस्तीत राहणाऱ्या लाखो स्त्रिया आजही यासंबंधीच्या महत्त्वाच्या माहितीपासून अनभिज्ञ आहेत. या पार्श्वभूमीवर जागृती सनी पाटील यांनी पुढाकार घेऊन कळंबोली येथील झोपडपट्टीमध्ये जाऊन येथील महिलांना मासिक पाळी आणि स्वच्छतेबाबत शास्त्रशुद्ध वैद्यकीय पद्धतीने माहिती दिली.



मासिक पाळीच्या वेळी महिलांचा थोडासा निष्काळजीपणा त्यांना हेपेटायटीस बी, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, तसेच वेगवेगळे संसर्ग यांसारख्या गंभीर आजारांकडे ढकलू शकते हेही त्यांना माहीत नाही. त्याचा परिणाम महिलांवर केवळ शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही दीर्घायुष्यावर होऊ शकतो. विशेष करून गरीब लोक वस्ती मध्ये राहणाऱ्या अत्यल्प उत्पादन गटातील महिलांना याबाबत माहिती नसते. या गोष्टीचा विचार करून जागृती सनी पाटील पुढाकार घेऊन कळंबोली वसाहतीतील सिंग सिटी हॉस्पिटल समोरील झोपडपट्टी तसेच पावसाळी नाल्याच्या बाजूला असलेला गणेश नगरमध्ये शनिवारी सकाळी जाऊन संबंधित महिलांना मासिक पाळी बाबत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले.

या उपक्रमाला येथील स्त्रियांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आणि मासिक पाळीच्या वेळी आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जपण्याचा जणू काही संकल्पच केला. या वेळी रसिका सतिश पाटील, ज्योती नाना सोलंकी, रेखा देवेंद्र मांजरेकर, शिल्पा रघुनाथ झाकडे, मेघा संदीप पाटील, रेणू अमित पडवळ उपस्थित होते.

कळंबोली येथील ज्या झोपडपट्ट्या आहेत. तेथील महिला अत्यंत गरीब आहेत. कचरा वेचून ते आपला उदरनिर्वाह करतात. दोन वेळचं त्यांना कसेबसे अन्न मिळते. त्यामुळे सॅनिटरी नॅपकिन वापरणे त्यांना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. या वस्तुस्थितीचा विचार करून प्रत्येक महिन्याला या झोपडपट्टीमधील भगिनींना सॅनिटरी नॅपकिन आम्ही देणार असल्याचे जागृती सनी पाटील यांनी सांगितले.

# आपटा रेल्वे पुलाखालील लोखंडी जाळी स्वच्छ करण्याची मागणी

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी हद्दीतील आपटा येथे नवीन रेल्वे पुलाखाली बसविण्यात आलेली लोखंडी जाळी स्वच्छ करण्यात यावी, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

दांड आपटा रोडवरील लाडीवली मंदिराच्या जवळील रेल्वे पुलाखालील लोखंडी जाळीचा पाणी जाण्यासाठी केलेला रोडचा भाग आहे. हा तातडीने लोखंडी जाळी बाजूला काढून हा रोड साफ केला पाहिजे, कारण येथे पावसाळ्यात पाणी तुंबून राहते व सर्व वाहतूक व्यवस्था बंद पडते. खूप पाणी साठते त्यामुळे हे काम येणाऱ्या दोन ते चार दिवसांत केले पाहिजे. हे काम केले नाही तर येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होईल. यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने हे काम युद्ध पातळीवर सुरू केले पाहिजे, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.



# जेएनपीए-एसईझेड गुंतवणूकदारांना भविष्यात उत्तम संधी

## इन्व्हेस्टर कॉन्क्लेव्ह २०२२ उत्साहात

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीएने मुंबईत भारतीय उद्योग महासंघाच्या सहकार्याने जेएनपीए-एसईझेड इन्व्हेस्टर कॉन्क्लेव्ह २०२२चे आयोजन शुक्रवारी (दि. २७) केले होते. गुंतवणूकदारांना भविष्यातील विकासामध्ये गुंतवणुक करण्यासाठी व देशाच्या वाढत्या बंदर-उद्योग आधारित अर्थव्यवस्थेचा एक भाग होण्यासाठी गुंतवणूकदारांना भरपूर संधी उपलब्ध देण्याच्या उद्देशाने या कॉन्क्लेव्होचे आयोजन करण्यात आले होते.




बंदर आधारित औद्योगिकीकरणाच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने, जेएनपीएने हा बहुउत्पादन विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प २७७.३८ हेक्टर फ्रीहोल्ड जमिनीवर विकसित केला आहे. अशाप्रकारचे हे औद्योगिक केंद्र भारतातील पहिले बंदर-आधारित बहु-उत्पादन कार्यरत विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) आहे. याबाबत जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, जेएनपीए एसईझेडच्या या विशिष्ट प्रकल्पासह बंदर-आधारित व्यवसाया वाढीच्या पैलूंना अधिक बळकट करण्यासाठी सज्ज आहे. अतिरिक्त आर्थिक क्रियाकलाप निर्माण करणे निर्यात व गुंतवणुकीला चालना, रोजगार निर्मिती आणि पायाभूत सुविधांचा विकास हे जेएनपीए सेझची उद्दिष्टे आहेत. जेएनपीए-एसईझेड गुंतवणूकदारांना गुंतवणूकीसाठी विशेष प्रोत्साहन देत आहे. जेएनपीए-एसईझेडसाठी विविध पायाभूत सुविधां विकासित करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये रस्ते, वीज, पाणी, स्ट्रॉम वॉटर ड्रेन, सांडपाणी संकलन व उपचार आणि घनकचरा विल्हेवाट सारख्या सर्व मूलभूत पायाभूत सुविधांचा समावेश आहे. एसईझेडच्या सर्व भूखंडाना रस्ते, पाणी, वीज आणि सांडपाण्याची लाईन यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी बंदरांचे महत्त्वही कॉन्क्लेव्हमध्ये अधोरेखित करण्यात आले आणि बी टू बी बैठका झाल्या. या कार्यक्रमास जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, विभागीय विकास आयुक्त श्याम जगन्नाथन, सीमाशुल्क आयुक्त एन. व्ही. कुलकर्णी, नितिन बोरवणकर, सीईओ, जेएनपीए-सेझ उपस्थित होते.

# तहसीलदारांच्या पुढाकाराने विद्यार्थिनीला एज्युकेशन लोन

**खारघर : प्रतिनिधी**

घरातील परिस्थिती हालाकीची, वडिलांचे निधन, आई आणि तिघी बहिणी असा कुटुंब असलेल्या तालुक्यातील कासारभट गावातील तरुणीला पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या पुढाकाराने एज्युकेशन लोन मिळाले आहे.

बीएचएमएसचे शिक्षण घेणारी स्नेहल अनिल म्हात्रे (वय १९) हि बहिणीच्या शाळा सोडल्याचा दाखल्याच्या कामासाठी पनवेल पंचायत समितीमध्ये आली होती. या वेळी बहिणीच्या कामासह स्वतःच्या शिक्षणात शासकीय योजनेचा काही लाभ मिळु शकेल का? याकरिता विचारणा करीत असताना, पंचायत समितीमधील अधिकारी मंगेश मटकर यांनी तहसीलदारांना याबाबत माहिती दिली. तहसीलदार विजय तळेकर यांनी त्वरित प्रतिसाद देत विद्यार्थिनीला तहसील कार्यालयात बोलावुन घेतले. तिची म्हणणे ऐकून घेऊन त्वरित पनवेल शहरातील बँक ऑफ महाराष्ट्राच्या व्यवस्थापक पिंकी राणी यांना फोन करून विद्यार्थिनीला एजुकेशन लोन देण्याबाबत विचारणा केली. आवश्यकता भासल्यास या विद्यार्थिनीसाठी मी स्वतः गॅरेंटर राहतो हि तयारी दर्शवली.

बँक व्यवस्थापक पिंकी राणी यांनी देखील याबाबत पुढाकार घेत या विद्यार्थिनीला सुमारे दोन लाख ७३ हजारांची लोन मॉडेल एज्युकेशन लोन स्कीम अंतर्गत मंजूर करून दिली.

# धरमतर येथील बेकायदा वाळू उत्खननावर कारवाई

## वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील डोलवी गावाच्या हद्दीमधील धरमतर खाडीमध्ये संक्शन पंपाच्या सहाय्याने सुरू असलेल्या बेकायदा वाळू उत्खनन विरोधात बुधवारी (दि. २५) दुपारी महसुल विभागाकडून कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये दोन संक्शन पंपासह एक लाख ५९ हजार रुपयाचा मुद्देमाल जागेवरच नष्ट करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे


(छाया : अनिस मनियार)

महसुल विभागाचे अधिकारी रत्नकांत सूर्यवंशी यांना नायब तहसीलदार सुनील जाधव यांनी दिलेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. डोलवी गावातील धरमतर खाडीमध्ये जुन्या पुलाच्या खाली अवैध वाळू सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर मंडळाधिकारी रत्नकांत सूर्यवंशी, वडखळच्या तलाठी पार्वती वाघ, तलाठी गंगाधर कोरडे, तलाठी विलास म्हात्रे, कोतवाल सुशील पत्रे, वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक निलेश पाटील यांचे पथक घटनास्थळी पोहोचले. तेव्हा पेण-अलिबाग रोडलगत धरमतर खाडीमध्ये जुन्या पुलाखाली दोन अनोळखी इसम बेकायदेशीररित्या संक्शन पंपाद्वारे वाळू उत्खनन करून त्याचा काटा करीत असताना दिसून आले. मात्र अधिकारी कारवाईसाठी येत असल्याचे पाहून त्यांनी घटना स्थळावरून पळ काढला. या ठिकाणी प्रत्येकी २५ हजार रुपये किमतीचे दोन संक्शन पंप व वाळू असा एक लाख ५९ हजारांचा मुद्देमाल सापडला. दोन्ही सक्शन पंप जागेवरच तोडफोड करून नष्ट करण्यात आले तर वाळू खाडीपात्रात ढकलून देण्यात आली.

याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात भादवि कलम ३७९,३४ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५,१९ महाराष्ट्र जमीन कायदा कलम ४८ (७),(८) या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक भोर करीत आहेत.

# वीज बिलाच्या वादातून सख्ख्या भावावर कोयत्याने हल्ला

**माणगाव : प्रतिनिधी**

वीज बिल भरण्यावरून झालेल्या वादातून सख्ख्या भावावर शुक्रवार (दि. २७) रात्री कोयत्याने वार करून त्याला जखमी केल्याप्रकरणी आरोपी भावावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**माणगाव तालुक्यातील रवाळजे गावातील घटना**




शुक्रवार (दि. २७) रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील नवे रवाळजे गावात फिर्यादी व आरोपी यांच्या घराच्या पडवीत घडली.याबाबतची फिर्याद प्रमोद लक्ष्मण मोरे (वय-३४) रा. नवे रवाळजे ता.माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

सदर गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि,घटनेतील फिर्यादी प्रमोद लक्ष्मण मोरे (वय ३४) व आरोपी सुरेश लक्ष्मण मोरे (वय ४०, दोघे रा. नवे रवाळजे, ता. माणगाव) हे नात्याने सख्खे भाऊ असून ते वडिलोपार्जित घरात वेगवेगळ्या रूममध्ये राहत असून, दोन्ही रूमला एक सामायिक वीजमीटर आहे. सहा महिन्यापूर्वीचे थकबाकी वीजबिल फिर्यादी प्रमोद याने एकट्याने भरले होते. मात्र आता आलेल्या वीजबिलाची अर्धीच रक्कम सुरेश मोरे याने भरणा केली होती. त्यामुळे वीज जोडणी बंद करण्याकरिता शुक्रवारी महावितरणचे कर्मचारी आले होते. त्यावरून फिर्यादी प्रमोद घरात बडबड करीत असताना पुतण्या आयुष सुरेश मोरे याने विचारणा केली. त्या वेळी प्रमोदने त्याची कॉलर पकडली. त्याचा राग येऊन आरोपी सुरेश याने प्रमोद यांना शिवीगाळी करीत त्यांच्या दोन्ही हातावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात प्रमोद मोरे जखमी झाले.

या प्रकरणी प्रमोद लक्ष्मण मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणगाव पोलीस ठाण्यात सुरेश मोरे याच्यावर भादवि कलम ३०७,५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. आघाव करीत आहेत.

# खोपोली लवजी येथे दिवसाढवळ्या मोबाइल चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लवजी गावातील निर्मल भक्ती या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील सावंत यांच्या घरातून गुरुवारी (दि.२६) सकाळी दोन मोबाइल संच, एक घड्याळ व एक इअरफोन असा अंदाजे साठ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात इसमाने लंपास केल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.


लवजी गावातील निर्मल भक्ती या इमारतीमध्ये एक अज्ञात महिला गुरुवारी सकाळी शिरली व शेजारच्या इमारतीत मधाचा पोळा काढावयाचा आहे, मधमाशा हल्ला करू शकतात, सर्वांनी दरवाजे बंद करा असे इमारतीतील सदनिकाधारकांना सांगू लागली. त्यानंतर दुसऱ्या मजल्यावर राहणारे केतन सावंत यांच्या मातोश्री सकाळी पाणी भरण्यासाठी खाली आल्या, त्याचक्षणी एक अनोळखी इसम दुसऱ्या मजल्यावर त्यांच्या घरावर जवळ गेला. त्याने सावंत यांचा दरवाजा उघडा आहे असे पाहिले, केतन सावंत झोपले होते. याचा फायदा घेत अज्ञात इसमाने घरात घुसून दोन मोबाइल, एक किमती घड्याळ व इअरफोन असा सुमारे साठ हजारांचा ऐवज घेऊन पोबारा केला. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने रहिवाशांमध्ये खळबळ उडाली.

दरम्यान, या अज्ञात महिलेला रहिवाशांनी पोलिसांच्या स्वाधीन केले असून अज्ञात चोरटा पळून जाण्यात यशस्वी झाला. या घटनेबाबत केतन सावंत यांनी खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास सुरू आहे.

# कर्जत, नेरळ, माथेरानमध्ये खुलेआम मटक्याचा जुगार सुरू

**कर्जत : बातमीदार**

कर्जत, नेरळ आणि माथेरानमध्ये खुलेआम मटक्याचे अड्डे सुरू असून, तेथे जुगार खेळण्यासाठी नेहमी गर्दी होत असते. मात्र पोलीस प्रशासनाचे या मटका अड्ड्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने संशय व्यक्त होत आहे.



कर्जत शहरात गेले अनेक महिने मटका आणि गावठी दारू विक्रीचे अवैध धंदे बंद होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून हे सर्व अवैध धंदे पुन्हा सुरु झाले आहेत. बाजार पेठेतील मच्छी मार्केटमधील डागा बिल्डिंगमध्ये दिवसाढवळ्या मटका जुगार चालू आहे. महत्त्वाचे म्हणजे हा मटका जुगार जिथे चालू आहे, त्यांच्या बाजूलाच पाच फुटावर कर्जतचे ग्रामदैवत धापया महाराज यांचे मंदिर आहे. जुन्या एसटी स्टँड परिसरातही मटका जुगार उघडपणे चालू झाला आहे.

नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल तीन ठिकाणी मटक्याचे अड्डे सुरु असल्याचे बोलले जात आहे. नेरळ स्टेशन परिसरात असे अवैद्य धंदे सुरु असल्याची चर्चा नेहमी असते मात्र आता नेरळ एसटी स्टँड भागातदेखील मटक्याचा जुगार सुरु असल्याचे बोलले जात आहे. माथेरान या पर्यटन स्थळीदेखील दोन ठिकाणी मटक्याचे अड्डे सुरु आहेत.

कर्जत तालुक्यात मटक्याचे अड्डे राजरोसपणे सुरु असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या मटका आणि जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# वॉटर स्पोर्ट्स, किल्ला प्रवासी होडी वाहतूक बंद

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर २६ मे ते ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत जलक्रीडा प्रकार आणि किल्ला प्रवासी होडी वाहतूक बंद राहणार आहे. तसेच मुरूड येथील जंजिरा किल्लाही पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे. मेरीटाईम बोर्डाने याबाबत निर्णय घेतला आहे.

पावसाळा तसेच समुद्रात उसळणाऱ्या लाटांच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बंदी घालण्यात आली आहे. या बंदी कालावधीत वॉटर स्पोर्ट्स किंवा बोटिंग सुरु ठेवल्याचे आढळल्यास संबंधित व्यावसायिकावर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे.



# वारकरी साहित्य परिषद जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मणबुवा येरम

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र वारकरी संप्रदाय तर्फे रायगड जिल्हा वारकरी साहित्य परिषद अध्यक्षपदी हभप लक्ष्मणबुवा येरम (रा. उंबरे, ता. खालापूर) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्याबद्दल खोपोली भाजपतर्फे शुक्रवारी (दि. २७) सायंकाळी लक्ष्मणबुवा येरम यांना सन्मानित करण्यात आले.


(छाया : विनायक माडे)

खोपोली शहर भाजप कार्यालयात शुक्रवारी झालेल्या या कार्यक्रमात शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांच्या हस्ते हभप लक्ष्मणबुवा येरम यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वारकरी संप्रदायाच्या कार्यात लक्ष्मणबुवा येरम यांनी दिलेल्या योगदानाबद्दल भाजप कामगार सेलचे सूर्यकांत देशमुख यांनी गौरवोद्गार काढले. इंदरमल खंडेलवाल यांनीही मनोगत व्यक्त केले.

भाजपचे खोपोली शहर सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, शहर महिला मोर्चा अध्यक्षा शोभाताई काटे, सरचिटणीस अश्विनीताई अत्रे, व्यापारी सेलचे कीर्ती ओसवाल, ज्येष्ठ कार्यकर्त्या स्नेहल सावंत, मोरेश्वर दाते, हिम्मतराव मोरे यांच्यासह अन्य मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**अलिबाग : जिमाका**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्ताने शनिवारी (दि. २८) जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला तहसीलदार (संजय गांधी योजना) ज्ञानदेव यादव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी तहसीलदार विशाल दौंडकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



# मुरूडमध्ये शेतीच्या कामांना वेग; शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

**मुरूड : प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आल्याने मुरूड तालुक्यातील शेतीच्या मशागतीच्या कामांना वेग आला आहे. अनेक ठिकाणी शेतकरी शेतात मशागतीची कामे करताना दिसत आहेत तर काही ठिकाणी मशागतीची कामे पूर्णत्वाकडे आली आहेत. मशागतीची कामे आटोक्यात आल्याने माणगावातील शेतकरी पावसाची प्रतीक्षा करीत आहेत.

मोसमी पाऊस येण्याला काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्वप्रथम जमीन नांगरणीला सुरुवात केली आहे. जमिनीत असणारे गवत व तृण कायम स्वरूपी जाण्यासाठी सर्वप्रथम मशागत केली जाते. शेतजमिनीला गवताच्या सहाय्याने जळून कोणतेही गवत उगवणार नाही यासाठी ही प्रक्रिया केली जाते. त्यानंतर नांगरणी करून, मातीचे ढोकळे फोडून सर्व शेतजमीन मऊ केली जाते. सध्या मुरूड तालुक्यात शेतीच्या मशागतीची कामे जोरदार सुरु आहेत. शेतकऱ्यांना आता पावसाची अपेक्षा असून पुरेसा पाऊस पडल्यास शेतकरी पेरणीच्या कामाला लागणार आहेत.

मुरूड तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रात भातपीक घेतले जाते. मशागतीची कामे आवाक्यात आल्याने शेतकरी कृषी केंद्रांवर जाऊन बियाणे आणि खतांची खरेदी करीत आहेत. हवामान खात्याने यंदा मोठ्या प्रमाणात पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त केल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. यंदा चांगला पाऊस पडून भातपीक जोमात येईल, असा विश्वास मुरूड तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.


(छाया : संजय करडे)

# प्रा. सूर्यकांत अमलपुरे समता पुरस्काराने सन्मानित



**रोहे : प्रतिनिधी**

हरियाणातील आचार्य अकादमी-चुलीयाना या संस्थेने घेतलेल्या वार्षिक साहित्यिक स्पर्धेमध्ये कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रमुख प्रा. सूर्यकांत विश्वनाथ अमलपुरे यांनी पाठवलेल्या 'संत रविदास -सृजन के अलोक में' या कलाकृतीला सन २०२२ चा डॉ. भीमराव आंबेडकर समानता व समता या पुरस्कार जाहीर झाला असून, नुकताच झालेल्या एका कार्यक्रमात प्रा. सूर्यकांत विश्वनाथ अमलपुरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि १५०० रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. भीमराव आंबेडकर समानता व समता या पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. सूर्यकांत अमलपुरे यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, कार्यालय अधीक्षक विजय पाटील यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# कर्जत पोशीर येथील विधवा महिला झाली रिक्षाचालक




(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पोशीर गावातील भगवान शेकटे या रिक्षाचालकाचे कोरोना महामारीत निधन झाले. त्यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी संघटनेने घेतली आहे. तरीदेखील घर कसे चालवावे याचे गणित बसत नसल्याने शेवटी त्यांच्या विधवा पत्नी भाग्यश्री भगवान शेकटे यांनी आपल्या पतीची रिक्षा चालवून कुटुंब चालविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या आता कळंब-नेरळ राज्यमार्गावर रिक्षा व्यवसाय करू लागल्या आहेत.

कर्जत तालुक्यातील पोशीर गावातील भगवान शेकटे हे रिक्षाचालक होते, त्यांची स्वतःची रिक्षा होती. संपूर्ण प्रपंच हा रिक्षा व्यवसायावर चालला होता. मात्र कोरोना महामारीत १७ मे २०२१ रोजी भगवान शेकटे यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी भाग्यश्री आणि चार मुले आहेत. भगवान शेकटे यांच्या मृत्यूनंतर पत्नी भाग्यश्री यांच्यासमोर अनेक प्रश्न निर्माण झाले.

नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी संस्थेने भाग्यश्री शेकटे यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य तसेच ऑनलाइन शिक्षणासाठी दोन मोबाईल दिले. विधवा भाग्यश्री शेकटे यांनी त्यांच्या पतीची रिक्षा चालवावी, असा पर्याय संस्थेने ठेवला. त्याला त्यांनी संमती दर्शविली. या नंतर संस्थेने कर्जतमधील पहिली महिला रिक्षाचालक निशा गुप्ता यांच्याशी संपर्क साधून त्यांना रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण दिले. रिक्षा चालविण्यासाठी आवश्यक असणारे लायसनसुद्धा संस्थेने मिळवून दिले आहे. आता आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी भाग्यश्री शेकटे पोशीर ते नेरळ, कळंब या मार्गावर रिक्षा चालवत आहेत.

# ‘रॉयल’ विजयासह राजस्थान पोहचले १४ वर्षांनंतर आयपीएल फायनलमध्ये

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

जोस बटलरच्या नाबाद १०६ धावांच्या खेळीच्या जोरावर राजस्थानने बंगलोरवर सात गडी राखून विजय मिळवला. रजत पाटीदारच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर बंगळुरूने २० षटकांत १५७ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना राजस्थानने ’रॉयल’ विजय मिळवला. या विजयाचा बॉस ठरला जोस बटलर. बटलरने हंगामातील चौथे शतक ठोकले आणि राजस्थानला तब्बल १४ वर्षांनी आयपीएलच्या फायनलमध्ये पोहोचवले. या आधी २००८च्या हंगामात राजस्थानचा संघ फायनलमध्ये पोहचून फायनल जिंकली होती. आता रविवारी (दि. २९) राजस्थानचा संघ फायनलमध्ये गुजरात विरूद्ध खेळणार आहे.

**जॉस बटलर... विजयाचा बॉस!**



राजस्थान रॉयल्स विरूद्ध बंगळुरूचा विराट कोहली आणि कर्णधार फाफ डू प्लेसिस दोघे सलामीला आले. विराट सात धावांवर बाद झाला. त्यानंतर डू प्लेसिसची संथ खेळी २५ धावांवर संपुष्टात आली. ग्लेन मॅक्सवेल आणि रजत पाटीदारने तुफान फटकेबाजीला सुरूवात केली होती, पण मॅक्सवेल २४ धावांवर बाद झाला. रजत पाटीदारने मात्र ४२ चेंडूत ५८ धावांची खेळी केली. त्यात चार चौकार आणि तीन षटकार ठोकले. तो बाद झाल्यावर बंगळुरूचा डाव गडगडला. महिपाल लोमरोर (८), दिनेश कार्तिक (६), वानिंदू हसरंगा (०), हर्षल पटेल (१) दोघे झटपट बाद झाले. शाहबाज अहमदने नाबाद १२ धावा करीत संघाला १५० पार मजल मारून दिली.

आव्हानाचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वालने धडाकेबाज सुरुवात केली. त्याने १३ चेंडूत २१ धावा केल्या. त्यात दोन षटकार आणि एक षटकाराचा समावेश होता. त्यानंतर कर्णधार संजू सॅमसनने २१ चेंडूत दोन षटकार व एका चौकारासह २३ धावा केल्या. जोस बटलरने मात्र तुफानी खेळी सुरूच ठेवली.

देवदत्त पडिक्कलला १२ चेंडूत नऊ धावाच करता आल्या, पण बटलरने मात्र एकतर्फी सामना जिंकवून दिला. त्याने दणदणीत शतक ठोकले. त्याचे हे यंदाच्या हंगामातील चौथे शतक आहे. एकाच हंगामात सर्वाधिक शतक ठोकण्याच्या विराटच्या विक्रमाशी त्याने बरोबरी साधली.



स्व. सिकंदर केळकर स्मृतीचषक कबड्डी स्पर्धा

## जे. एस. डब्ल्यू डोलवी संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्व. सिकंदर केळकर मित्रमंडळ, रायगड यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्व. सिकंदर केळकर स्मृतीचषक जिल्हास्तरीय व्यावसायिक कबड्डी स्पर्धेत जे. एस. डोलवी संघाने विजेतेपद पटकावले. स्टार रिवाईडन धाटाव संघ उपविजेता ठरला. खुशबू आयस्क्रीम अलिबाग संघाने तृतीय तर युवराज स्पोर्ट्स वायशेत संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

स्व. सिकंदर केळकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मुलाच्या शैक्षणिक मदतीसाठी अलिबाग तालुक्यातील बांधण येथे स्व. सिकंदर केळकर मित्रमंडळ रायगड यांच्यातर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जे. एस. डब्ल्यू. संघाचा राज पाटील स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू ठरला. युवराज स्पोर्ट्सचा स्वप्नील वेळे पब्लिक हिरो ठरला. स्टार रिवाईडनचा अजय मोरे याला उत्कृष्ट चढाईचे तर जे. एस. डब्ल्यूचा सुचित पाटील याला उत्कृष्ट पकडीचे पारितोषिक देण्यात आले.

स्व. सिकंदर केळकर यांचे कबड्डीतील मित्र, राजकीय पुढारी, कबड्डी प्रेमी व गामस्थांनी या स्पर्धेसाठी आर्थिक हातभार लावला. स्पर्धेतून जमा झालेला निधी स्व. सिकंदर केळकर यांच्या पत्नीकडे देण्यात आला. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीने देखील आर्थिक दिली.

महिंद्रा ॲण्ड महिंद्राचे स्वप्नील शिंदे, संजय पोइलकर यांनी सिकंदर केळकर यांना श्रध्दांजली वाहिली. वसंत भोईर, रोहित पाटील, सागर थळे यांनी श्रद्धांजली गीत सादर केले. सर्व राजकीय पक्षांचे नेते, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू, प्रो कबड्डी खळाडू, छत्रपती पुरस्कार विजेते कबड्डीपटू यांनी या स्पर्धेस भेट दिली.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्व. सिकंदर केळकर मित्रमंडळ रायगडला महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, पंच मंडळ व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले.



## आयपीएलचे फायनलिस्ट होणार मालामाल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२२च्या क्वालिफायर २मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला राजस्थान रॉयल्सकडून सात गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला, मात्र पराभव होऊनही या संघावर कोट्यवधींचा पाऊस पडला.

राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या पराभवानंतर बंगळुरूने पॉइंट टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर हंगाम संपवले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या हंगामासाठी बंगळुरूला सात कोटी, तर चौथ्या क्रमांकावर असलेल्या लखनऊ सुपर जायंट्सच्या खात्यात ६.५० कोटी रुपये जमा होतील.

गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्सने यंदाच्या आयपीएलच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. या सामन्यातील विजेत्या संघाला २० कोटी तर उपविजेत्या संघाला १३ कोटी मिळतील. याशिवाय पर्पल कॅप आणि ऑरेंज कॅप जिंकणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी १५ लाख रुपये बक्षीस रक्कम दिली जाईल. दुसरीकडे, उदयोन्मुख खेळाडूला २० लाख रुपयांचे बक्षीस मिळणार आहे.

## नॅशनल मास्टर गेम्स स्पर्धेत उरणच्या खेळाडूंचे सुयश

**उरण : बातमीदार**

चौथी ॲथलेटिक्स नॅशनल मास्टर्स गेम्स स्पर्धा तिरुवनंतपुरम केरळ येथे १८ ते २२ मे दरम्यान झाली. या स्पर्धेत उरणच्या स्पर्धकांनी सुयश प्राप्त केले आहे.

या स्पर्धेत भारताच्या प्रत्येक राज्यातील तब्बल ५,५०० खेळाडूंनी यात सहभाग घेतला होता. या स्पर्धेत उरणमधील योगा विथ पूनमच्या योगशिक्षिका सहभागी झाले होते. या खेळाडूंनी उत्तम कामगिरी बजावून सुयश प्राप्त केले आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



योगाशिक्षक राम चौहान यांनी गोळाफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक व भालाफेक स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकविला आहे. राम चौहान हे उरण एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडियम स्कूल येथे शारीरिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

योग शिक्षिका पुनम चौहान यांनी १० किलोमीटर धावणे प्रथम क्रमांक तर १५०० मीटर धावणे या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकविला आहे. पूनम चौहान या उत्तम योगा शिक्षिका आहेत. उरणमधील दोन्ही शिक्षकांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.







**पनवेल : नवीन पनवेल येथील आदई सर्कलजवळील राजीव गांधी मैदानात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रक्षिशण केंद्र महापालिकेच्या वतीने उभारण्यात येत आहे. या केंद्राच्या कामाची पाहणी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी अधिकाऱ्यांसह करून आवश्यक त्या सूचना दिल्या. या वेळी शहर अभियंता संजय कटेकर, अधिकारी साळुंखे उपस्थित होते.**

## निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत गावस्कर संघ विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

१४ वर्षांखालील निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सुनील गावस्कर संघाने विजेतेपद पटकावले. गावस्कर संघ २१३ धावांवर गारद झाल्यानंतरही शुक्रवारी (दि. २७) रवी शास्त्री संघाला १३७ धावांत गुंडाळून त्यांनी जेतेपद निश्चित केले.

२८ धावांत सहा बळी मिळवणारा ऑफ-स्पिनर गजानन नारपगोल हा विजयाचा शिल्पकार ठरला. शास्त्री संघाच्या स्मिन किणी आणि दैविक सावे यांचा अपवाद वगळता अन्य फलंदाज अपयशी ठरले. दुसऱ्या सामन्यात सचिन तेंडुलकर संघाने सात बाद २९९ धावांचे आव्हान ठेवले. दिलीप वेंगसरकर संघाने पाच फलंदाज १०९ धावांत गमावले होते, मात्र आयुष शेट्ये (१०२) आणि तनिश शेट्टी (१०२) यांनी झुंजार फलंदाजी केली. आयुष शेट्ये सर्वोत्तम फलंदाज, गजानन नारपगोल सर्वोत्तम गोलंदाज आणि वेदांत गोरे सर्वोत्तम क्षेत्ररक्षक ठरला.




**दिलीप वेंगसरकर यांचा सल्ला**

माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी, खेळाडूंनी नेहमी आपला सर्वोत्तम खेळ सादर करावा. आपले नाणे किती खणखणीत आहे, ते आपल्या कामगिरीनेच सिद्ध करून दाखवावे, असा सल्ला दिला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com